
॥ग्रंथाली॥

इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग,
ऑफ गोखले रोड (उ), दादर (प), मुंबई ४०००२८
दूरध्वनी : २४४७४८४३ ग्रँटरोड – २३८७५४८१/२३८९२४४५

# दीपस्तंभ : षांताराम पवार



शुक्रवार, १४ जानेवारी २०११ रोजी, प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिराच्या मिनी थिएटरमध्ये, संध्याकाळी ७.०० वाजता, ग्रंथाली प्रकाशित **षांताराम पवार** यांच्या व्यक्तित्वाचा मागोवा घेणाऱ्या **'दीपस्तंभ'** या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. **दीपक घारे** आणि **रंजन जोशी** यांनी संपादन केलेल्या आणि **अरुण काळे** यांचे मुखपृष्ठ असलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन **अरुण साधू** यांच्या हस्ते होत असून, अध्यक्ष म्हणून **डॉ. रवी बापट** उपस्थित राहणार आहेत. सर जे.जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्टचे पूर्वअधिष्ठाता **मं.गो. राजाध्यक्ष,** तसेच **संजय पवार** आणि **दीपक घारे** हे अन्य वक्ते षांताराम पवार यांच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त करतील. ग्रंथालीचे संस्थापक–सदस्य **दिनकर गांगल** षांताराम पवार यांच्याशी संवाद साधणार आहेत.


अवश्य यावे.

आपले,

**दीपक घारे, सुदेश हिंगलासपूरकर, रंजन जोशी**

---

प्रकाशनस्थळी मूळ ३५० रुपयांचे हे पुस्तक केवळ २०० रुपयांत मिळेल
व ग्रंथालीची अन्य पुस्तके सवलतीत उपलब्ध असतील.


ग्रंथाली वाचक चळवळीचे
रुची
जानेवारी २०११
मूल्य १० रुपये
वाचकदिन
ग्रंथालीचे
'ग्रेस'फुल
साहित्य संमेलन
“मी तुम्हाला सोने देऊ
शकतो, पण मला
सोन्याच्या खाणीचा”

# वाचकदिनाचा भरगच्च कार्यक्रम...




लतिका भानुशाली
सूत्रसंचालन करताना



खास वेळ काढून उपस्थित राहिलेल्या संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे यांचे स्वागत करताना सुदेश हिंगलासपूरकर



सुदेश हिंगलासपूरकर
भावना व्यक्त करताना



संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे
यांचा रसिकांशी संवाद



दिनकर गांगल विचार मांडताना



सुधीर थत्ते
'नोबेलनगरीतील
नवलस्वप्ने-२०१०' विषयी
मनोगत व्यक्त करताना



डॉ. नरेंद्र जाधव यांनी सादर केलेल्या कविता



ग्रंथालीचे
माजी अध्यक्ष आणि
'वाहतूक ठप्प...'चे लेखक
अशोक दातार बोलताना



डॉ. नरेंद्र जाधव यांनी
संपादित-अनुवादित केलेल्या
'भयशून्य चित्त जेथ...'
या कवितासंग्रहाची जनावृत्ती
कवी ग्रेस यांच्या हस्ते
प्रसिद्ध झाली.
सोबत संमेलनाध्यक्ष
उत्तम कांबळे



ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य दिनकर गांगल आणि लोकप्रभाचे संपादक प्रवीण टोकेकर यांच्या हस्ते ग्रंथालीच्या सहा नवीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. पैकी अरुणा ढेरे संपादित 'सुगंध उरले, सुगंध उरले' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी नंदिनी व सुधीर थत्ते,
दिनकर गांगल, अशोक दातार, प्रवीण




**ग्रंथाली प्रकाशित कवींचे संमेलन**

सूत्रसंचालन – नीरजा
सहभागी कवी –सदानंद डबीर, अशोक नायगावकर, प्रज्ञा पवार, छाया कोरेगावकर, किरण येले,










**ग्रंथाली ठाणे केंद्राचा विद्यार्थी वाचकदिन १८-१९ डिसेंबर रोजी पार पडला.**
**'ठाणे तिथे काय उणे' हे विषयसूत्र विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारे सादर केले होते.**
**त्यातील निवडक सादरीकरणांनी ग्रंथालीच्या ठाण्यातील पहिल्या वाचकदिनाचा आरंभ झाला.**




**गेली अनेक वर्षे ग्रंथालीची धुरा वाहणारे ठाण्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते व हितचिंतक यांचा खास सन्मान ग्रंथाली वाचकदिनी करण्यात आला.**



अशोक दातार यांच्या हस्ते अप्पा ऊर्फ वसंत नाईक यांचा सत्कार



अशोक दातार यांच्या हस्ते श्रीधर गांगल यांचा सत्कार



दिनकर गांगल यांच्या हस्ते अविनाश बर्वे आणि नंदिनी बर्वे यांचा सत्कार

**गेल्या वर्षभरात ज्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली त्या ग्रंथालीच्या उपस्थित लेखकांचा छोटेखानी सत्कार करून स्वागत करण्यात आले.**



प्रवीण टोकेकर यांच्या हस्ते कमल देसाई यांचा सत्कार



दिनकर गांगल यांच्या हस्ते रवींद्र पाटील यांचा सत्कार



अशोक दातार यांच्या हस्ते आदिनाथ हरवंदे यांचा सत्कार



दिनकर गांगल यांच्या हस्ते शरयू घाडी यांचा सत्कार

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जानेवारी २०११ वर्ष ३१ वे,**
**अंक पहिला, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

'ग्रंथाली'चा या वर्षीचा वाचकदिन ठाणे इथे साजरा झाला. पस्तीस वर्षांच्या वाटचालीत ठाण्यात झालेला हा पहिला वाचकदिन 'ग्रंथाली साहित्य संमेलन' ठरला. कवी ग्रेस यांनी थेट रसिकांशी सलग दीड तास साधलेले अनुसंधान रसिकांना खिळवून ठेवणारे होते. आपल्यावर होणाऱ्या दुर्बोधतेच्या टीकेचा समाचार आपल्या पद्धतीने घेत ग्रेस यांनी केलेली विचारांची गुंफण ही रसिकांसाठी 'एकदा तरी अनुभवावे' अशी दुर्मीळ संधी झाली. दुपारी ३ ते रात्री १० इतका वेळ रसिकांमध्ये बसून त्यांनी सर्वच कार्यक्रमांना लावलेली उपस्थिती लक्षणीय होती.

त्यांच्या मुलाखती(!)आधी ग्रंथालीच्या नवीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. ज्यांनी अनेकांना लिहिते करून त्यांच्या पुस्तकांची प्रकाशने केली, त्या ग्रंथालीच्या संस्थापक-सदस्य आणि अग्रणी संपादक दिनकर गांगल यांच्या हस्ते 'ग्रंथाली'च्या पुस्तकांचे प्रकाशन होण्याचा योग आनंददायी होता. यावेळी लोकप्रभाचे संपादक प्रवीण टोकेकर हे प्रमुख पाहुणे होते.

चौऱ्याऐंशीव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे यांची उपस्थिती आणि त्यांनी उत्स्फूर्तपणे सादर केलेली कविता ही अनपेक्षित भेट ठरली. प्रत्यक्ष संमेलनात त्यांनी आवाहन केलेल्या 'नव्या आसूडा'व्यतिरिक्त विशेष काही घडले नाही. संमेलनाच्या पूर्वसंध्येला झालेले ग्रंथालीचे साहित्य संमेलन रंगतदार झाले. ग्रंथालीचे पूर्वप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, प्रज्ञा पवारांपासून त्या दिवशी ज्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले, त्या कवींसह आठ-दहा कवींच्या काव्यवाचनाने वाचकदिनाची सांगता झाली.

साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्षांनी उल्लेख केलेला 'नवा आसूड' महत्त्वाचा असताना, ज्याचा अर्थ वठणीवर आणणे असा आहे, सूड घेणे नव्हे, हे ध्यानात घेऊन समाजात योग्य विचारवंतांची आवश्यकता असायला हवी. ती सर्वंकष वाचनातून आणि माणूसपणाच्या सजगतेतून येते. ग्रंथालीने गेल्या पस्तीस वर्षांत जे आगळे ज्ञानपीठ उभे केले त्यात हाच विचार रुजवला. त्याच परंपरेची काही पुस्तके वाचकदिनी प्रसिद्ध झाली. त्यातील काही प्रस्तावना व त्यानिमित्त लेखांनी हा अंक सिद्ध झालाय.

नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– संपादक**

# कवी ग्रेस यांचे अनुसंधान

## प्रभाकर भिडे

ग्रंथालीचा वाचकदिन नेहमी २५ डिसेंबरला असतो. या वेळी ठाण्याच्या मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून तो २४ डिसेंबर रोजी ठाण्याला झाला. ग्रंथालीच्या नव्या पुस्तकांचे प्रकाशन, काव्यसंमेलन यांसह कवी ग्रेस यांच्याशी अनुसंधान अशा या कार्यक्रमाचे आयोजन मो.ह. विद्यालयाच्या पटांगणात केले होते.

ग्रेस बोलत होते. श्रोत्यांची ज्ञानेंद्रिये ग्रेसमय झाली होती. सृजन, संवेदनशीलता, प्रतिमा, कला आणि कलाकाराचा धर्म या विषयांवर महाकवी ग्रेस खुलून बोलले.

शब्दांच्या जोडणीतून प्रतिमांतरन्यास निर्माण होतो. मृत्यू माणसाच्या शरीराला मारू शकतो. पण कला, पूर्वनिर्मिती मरू शकत नाही. परमेश्वर चुकू शकतो. कलाकाराला चुकण्याचा अधिकार नाही. आपल्याला क्षणांचा अर्थ कळतो, युगाच्या भाषेत आपण बोलत नाही. सेमी फायनलवर आपला विश्वास नाही. थेट फायनलवर आपला विश्वास आहे, असे ग्रेस यांनी जोरकसपणे मांडले अन् कलाकार थेट अंतिमाशी भिडण्याची जिगर ठेवून असतो याचा प्रत्यय उपस्थितांना आला.

''स्वर्गापेक्षा नरक आपल्याला प्रिय आहे. नरकाची खबर आपण मोठ्या प्रमाणावर ठेवतो,'' असे सांगताना 'शिकवताना आपण नरक नाकारत नाही. अन् स्वर्ग स्वीकारत नाही' असे म्हणताना त्यांनी आपण केवळ डिस्प्लेअर असल्याचा पुनरुच्चार केला. स्त्रियांबद्दलचा आदर व्यक्त करत 'त्या सृजनाचे प्रतीक असतात' असे ग्रेस म्हणाले. एका अनोखळी स्त्रीने ''ग्रेस, तुम्हाला हात लावू का?'' असे विचारताच डोळ्यांत पाणी आल्याचे त्यांनी भावुकपणे सांगितले.

केशवसुतांच्या कविता सुबोध वाटणाऱ्यांना आपल्या कविता दुर्बोध वाटतात, असे कोणी म्हटले तर ती आपल्याला शिवीच वाटते असे सांगत ग्रेस म्हणाले, एकच संथा वारंवार दिल्याने ती तीक्ष्ण होते. मी भरवशाचा माणूस नाही, तर धोका पत्करणारा आहे. पुनरावृत्तीने आपण नवे परिणाम दाखवतो. गंगा बघण्यासाठी आपल्याला हिमालयात जावे लागत नाही. एक अशक्त प्रार्थना परमेश्वराजवळ करतो आणि ती अवखळ पर्वत निवासिनी अवतीर्ण होते, असे निर्मितीचे गुपित ग्रेस सांगून गेले. अढळ निर्मिती स्रोताबद्दल सांगताना त्यांनी म्हटले की,

*मेघ रडू द्यावा डोळी । सांज हाकारावी थोडी,*
*नेम चुकला तरीही । गंगा स्वीकारते उडी*

दु:खाशी आपली नाळ किती घट्ट आहे याची अनुभूती रसिकांना देताना त्यांनी कवितेच्या पुढील ओळी उद्धृत केल्या:

*ये कावळ्या इथे ये, आहेस तू उपाशी;*
*माझी खुडून खा ना प्राणातली उदासी*

आपल्या सामाजिक संचिताबद्दलही ग्रेस बोलले. इस्लामने आपल्या सर्वांना तीन देणग्या दिल्याचे त्यांनी सांगितले; ताजमहाल, प्रार्थना आणि मिर्झा गालिब. गालिबवर ते राहून राहून प्रेमाने बोलले. त्याच्या अनेक सुंदर रचनाही रसिकांना ऐकवल्या. कवी निदा फाजली यांच्या 'दो और दो का हमेशा चार कहां होता है, सोच समझ वालों को थोडी नादानी दे मौला' या ओळी ऐकवून कलाकाराच्या स्वभावाची चुणूक दाखवली.

ग्रंथालीच्या दिनकर गांगल यांनी आपल्या कवितेचे अट्टहासाने समर्थन केले होते अशी आठवण सांगत ग्रेस यांनी ''माझ्या सत्यानाशाला मी समर्थ आहे. मीच तो सुंदर करीन माझ्या स्वत:च्या जबाबदारीवर, मी विधान करतो'' असे सांगत स्वत:च्या कवितेचा प्रियकर आणि प्रचारक नसल्याचेही त्यांनी सांगितले.

''काही वेळा माझे वय काय हे विचारतात, पहाटेही असे प्रश्न विचारतात लोक. मला पक्ष्यांचाही आवाज सहन होत नाही. मी जेव्हा पाण्याला भेटायला जातो, त्यावेळी तो मला नको असतो म्हणून मी पहाटे पोहायला जातो. मी पाण्यात पोहत नाही... मी पाण्याला स्वत:स पाहण्याची शिकवण देण्यासाठी जातो, असे वेगवेगळ्या विषयावर आपले संवेदनशील मनाने टिपलेले अनेक अनुभव, तसेच बालकवींपासून–कुसुमाग्रज–जी.ए. उपनिषदे–पुराणे यांचा साहित्यावर आपले चिंतन व्यक्त केले. त्यांचे विचार ऐकले की एकीकडे त्यांचे नाते ज्ञानेश्वर तुकारामापासून नवीन कवी–लेखकांपर्यंत आहे हे जाणवते. पावणे दोन तास सतत बोलताना अनेक वेळा ग्रेससरांचा आवाज कधी वरच्या पट्टीत कधी खालच्या पट्टीत, कधी जेमतेच ऐकू जाई इतका कमी होत असे. शिवाय, हातानेही अभिनय केल्यासारखी त्यांची वाणी सतत बोले. साहजिकच श्रोते त्यांच्या बोलण्यात गुगूंन जात होतं. त्यांचे प्रगट चिंतन अतिशय विश्वासपूर्ण व ठाम असल्यामुळे रसिकांना त्यांच्याविषयी आदर वाटतो असे जाणवले.

**प्रभाकर भिडे**
बी/२०९, यमुना माधव सोसायटी,
सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व).
फोन : ०२५१–२४४३६४२

# ‘ग्रेस’– एक झुळूक वादळाची!

## अविनाश बर्वे

आपल्या हयातीतच दंतकथा बनलेल्या काही व्यक्ती असतात. कवी ‘ग्रेस’ त्यांपैकीच एक. घोंगावत येणारा, पाचोळ्यासारखं उडवून लावणारा, ज्याच्या आगमनाच्या चाहुलीनंही धडकी भरते अशा वादळाबरोबर झुळूक ही कल्पना विसंगत अशीच वाटेल, पण अठ्ठेचाळीस तासांचा मला ग्रेस यांचा जो सहवास लाभला त्या अनुभवाचं वर्णन करताना मला मात्र शीतल व सुखद वैशिष्ट्यांनी युक्त ‘झुळूक’ हीच संज्ञा योग्य वाटते. ग्रेस यांची कविता अथवा साहित्य याविषयी मला काही म्हणायचं नाही. कुणाच्याही सहज पकडीत येईल अशी त्यांची कविताही नाही. मला ते कसे दिसले ते सांगणं एवढाच माझ्या या लिहिण्याचा हेतू आहे. कोणत्या कारणामुळे मला त्यांच्या सहवासाचा लाभ मला झाला ते सारं मुळातूनच आपणास सांगावं असं वाटले.

गेली पस्तीस वर्षे ‘ग्रंथाली’चा वाचकदिन मुंबईत होतो आहे. यावर्षी तो ठाण्यात आयोजित करावा असा निर्णय ग्रंथालीच्या विश्वस्तांनी घेतला व अर्थातच ती जबाबदारी सुदेश हिंगलासपूरकरवर सोपविली. ८४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ठाण्यात आहे तेव्हा येणाऱ्यांना ग्रंथालीच्या वाचकदिनात सहभागी होता यावे हा हेतू. लेखक–वाचक संवाद, पुस्तक प्रकाशन, कवी संमेलन हे उपक्रम तर दरवर्षी असतातच, सोबत एक खास आकर्षणही योजिलं जातं. सर्व लेखक–कवींचा मुकुटमणी व एक आगळंच स्थान असलेल्या ग्रेस कवींना ऐकण्याची संधी मिळावी असा विचार यामागे होता.

सुदेशनं ग्रेस यांच्याशी संपर्क साधला. कोणी निमंत्रण दिलं व त्यांनी ते सहज स्वीकारलं असे होत नसावं. सुदेशच साधं, सरळ, स्पष्ट पण विनम्र बोलणं यामुळेच ग्रेस यांनी निमंत्रण स्वीकारलं असावं. निमंत्रणपत्रिकेपासून सर्वच व्यवस्था आपल्या सूचनेनुसारच करू असं सुदेशनं त्यांना सांगितलं व त्यानुसार सारं त्यानं केलही. खरं तर ग्रेस यांच्या काही खास अटी नसतातच. त्यांच्या जगण्याची स्वत:ची व स्वत:पुरतीच एक रीत आहे व त्यात त्यांना काही फरक चालत नाही एवढंच.

कोणतीही गोष्ट परिपूर्णपणेच करण्याचा त्यांचा स्वभाव आहे, कोणतीही गोष्ट कॅज्युअल घेण्याचा त्यांचा स्वभाव नाही. त्यामुळे कार्यक्रमाच्या पत्रिकेत लेआऊट, मजकूर किंवा फोटो त्यांच्या संकल्पनेप्रमाणे उतरल्यावरच छपाई होते. त्यांची मेलिंग लिस्ट असते. पत्रिका पाठविल्यानंतर काही व्यक्तींना ती मिळाली आहे की नाही याची ही आस्थेनं चौकशी करतात.

इतकं काटेकोर असणाऱ्या व्यक्तीचा प्रत्यक्ष सहवास कसा असेल असा विचार मनात येतोच. नागपूराहून विमानानं आल्यावर सांताक्रूझजवळील हॉटेलमध्ये त्यांच्या निवासाची व्यवस्था केली होती. २३ तारखेस तेथे राहिले असते. २४च्या कार्यक्रमासाठी तेथून ठाण्याला आले असते व पंचवीस तारखेस सकाळच्या विमानानं नागपुरास परतले असते. कार्यक्रमात त्यांचं येणं, त्यांची मुलाखत याचा सर्वांना सारखाच अनुभव आला असता. पण तसे व्हायचं नव्हतं. पूर्ण दोन दिवस त्यांच्या सहवासात राहण्याची संधी मला मिळायची होती. हा तपशील पूर्वनियोजित नव्हता. पण त्याअगोदर चार वर्षापूर्वी त्यांच्याशी माझा झालेला संपर्क वा संवाद यात त्याचं बीज होतं. वाचक चळवळ हे ग्रंथालीचं ध्येय. आम्ही काही मित्र ठाण्यात ही चळवळ शालेय विद्यार्थ्यात रुजवण्यासाठी विविध उपक्रम गेली बारा वर्षे करीत आहोत. विद्यार्थ्यांनी ‘ग्रेस’वर कार्यक्रम करण्याचं ठरवलं. कार्यक्रमाबाबत मी त्यांना कळवलं होतं. माझ्या घरी प्रॅक्टिस चाले. तेव्हा एकदोन वेळेस ते मुलांशी फोनवरून बोलले. दोन–चार महिन्यांत मला नागपुरास जाण्याचा योग आला. ग्रेस यांना भेटलो कार्यक्रमाची सी.डी. दिली. त्यांनी मुलांसाठी छोट्या भेटी दिल्या.

मी एका मतिमंदांसाठी कार्यरत संस्थेसाठी काम करतो. कुठेही गेलो, कोणाशीही संपर्क झाला की या संस्थेविषयी मी सांगतोच व त्या संस्थेस भेट देण्याची विनंतीही करतो. मी ग्रेस यांनाही तशी विनंती केली. ‘येईन’ म्हणालेही. दोन वर्षांपूर्वी पुन्हा गेलो होतो. दरम्यान संस्थेची निमंत्रणं पाठवीत होतोच.

ठाण्याच्या मो.ह.विद्यालयातून मी निवृत्त झालो त्यामुळे वाचकदिन ठाण्यात करण्याचं ठरल्यावर तो मो.ह.मध्येच आयोजित करण्याचं ठरवलं. एक महिना अगोदर ग्रेस यांना पत्र लिहून ठाण्यास कार्यक्रमाच्या निमित्तानं येत आहात तर डोंबिवलीजवळील खोणी गावातील आमच्या घरकुलास भेट देण्याची विनंती केली.

अगदी दोन–तीन दिवस अगोदर कार्यक्रम निश्चित झाला. २४ तारखेस एवढा ताण एकदम नको म्हणून २३ तारखेलाच खोणी येथे जाऊन येऊ असा निर्णय घेतला. माझा भाऊ शशिकांत बर्वे यांच्या गाडीनं ने–आण करायची होती. ही गोष्ट त्यानं आपला मित्र संजीव गणपुले यास सांगितली. खोणीहून पुन्हा सांताक्रूझच्या हॉटेलमध्ये जाण्याऐवजी येऊरच्या टेकडीवर आपल्या बंगल्यात राहण्यास त्यानं सुचवलं. ग्रेस यांना हवी असलेली शांतताही तेथे मिळेल व कार्यक्रमाच्या ठिकाणी सहज पोहोचता येईल हा विचार करून सुदेश व ग्रेस यांच्या संमतीनं

हा कार्यक्रम निश्चित झाला.

'झुळूक वादळाची' खरं तर इथून सुरू होते. ग्रेस यांना तिखटाचा कणही चालत नाही व मधुमेह असल्यानं गोडही नाही. सामान्यत: हॉटेलमध्ये असं नेमकं मिळणं कठीण म्हणून 'घरकुल' अर्थात मतिमंदांच्या वसतिगृहात जेवायला नेऊया असा विचार केला. दीड वाजता तिथं पोहोचलो. बरोबर श्रीमती सरोज जोशी या कोल्हापूरच्या चित्रकार होत्या. तिथलं साधंच जेवण त्यांना आवडलं. मनापासून त्यांनी तेथील सेविकेचं कौतुक केलं व कृतज्ञता ही व्यक्त केली. वसतिगृहाची सारी इमारत फिरून पाहिली व मग मतिमंद ज्या हॉलमध्ये होते तिथे बसले. वीस ते साठ वयोगटातील २२ मतिमंद तिथे आहेत. बहुतांश तीव्र मतिमंदत्व असलेले आहेत. जवळजवळ तासभर ग्रेस तिथे बसले होते. अंतर्मुख व किंचित उदास झाले असावेत. सर्व विश्वस्त आले होते. संस्थेची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. परतीच्या मार्गावर कितीतरी वेळ ते त्याच मन:स्थितीत होते.

येऊर येथील गणपुले यांच्या बंगल्यावर पोहोचल्यावर तेथील वातावरणानं ग्रेस सुखावले. फॉरेस्ट खात्याच्या अखत्यारीतील तेथील जंगल व बंगल्याभोवती सुरेख बगीचा मन मोहवून टाकणारा असाच आहे. ग्रेस यांच्याविषयी जे ऐकलेलं असतं त्यामुळे मनावर एक प्रकारचं दडपण आलं असतं पण प्रत्यक्षात ते एक मृदूभाषी साधे गृहस्थ आहेत. गणपुले व बर्वे दांपत्य रात्रीचं भोजन घेऊन आले तेव्हा सर्वजण एकत्रच जेवण घेऊया असं त्यांनी सुचवलं व अगदी हसत-खेळत पदार्थांची प्रशंसा करत भोजन झालं. ग्रेस स्त्रियांचा फार आदर करतात. त्यांच्याशी सन्मानपूर्वक वागतात. गणपुले दांपत्याच्या आदरातिथ्यानं ते भारावून गेले व कधी कोणत्याही कारणानं मुंबईस आलो तरी मुक्कामाला इथंच येऊ असं सांगितलं. 'अलका'चा उच्चारही अगदी वेगळ्या स्वरात करून ते हाक मारीत. भोजनानंतर व्हरांड्यात ज्या गप्पा झाल्या त्यावेळी प्रामुख्यानं तेच बोलत होते. पहाटे ४ वाजताच पोहायला जाण्याबाबत सांगितलं. या अवेळी जाण्याबाबतचे अनुभव ऐकण्यात सगळे रंगून गेलो. कडाक्याची थंडी असली तरी त्यात फरक नसतो हे ऐकून कोणीही चकित झाल्याशिवाय रहाणार नाही. 'माझी आजची उडी' यशस्वी होऊ दे अशी प्रार्थना ते करतात. प्रत्येक दिवशीची प्रार्थना त्याच दिवसापुरती, त्याच क्षणासाठी असते. प्रार्थनेचं कधीही ॲडव्हान्स बुकिंग नसतं. प्रार्थना, चर्चबेल्स, अंधार त्यांच्या लेखनात वारंवार येतात; एक गूढ वातावरण मनावर दडपण आणतं खरं पण त्यादिवशी त्यांच बोलणं ऐकण्यात आम्ही दंग झालो होतो. जणू त्यांची कविताच आम्ही ऐकत होतो. या शब्दाचा हा अर्थ किंवा या ओळीचा हा अर्थ असं काही समजलं नसेल पण आम्ही त्यांची भावदशा अनुभवत होतो. एका गूढ दु:खाचा, वेदनेचा अंत:प्रवाह आपल्या जवळून वाहतो आहे असं मला जाणवलं. ग्रेस जेव्हा बोलतात, लिहितात तेव्हा त्यांची जी भावदशा असते, त्यांची जी अनुभूती असते ती शतांशानं का होईना अनुभवणं म्हणजे ग्रेसची कविता समजणं असं मला वाटलं. जेवण झाल्यावर सहसा ते खाली बसत नाहीत. ते फेऱ्या मारतच बोलतात. ते उभे व आपण बसून बोलतो असं काहीसं होत असतं.

गंमत वाटावी अशी गोष्ट सांगतो. कोणी नवखा कवी ग्रेस यांच्याकडे जाईल व आपली कविता वाचून दाखवील असं कल्पनेतही शक्य नाही. नवखाच काय नावाजलेला कवीही ते धाडस करेल असं संभवत नाही. पण घरकुलात येणाऱ्याचं स्वागत म्हणून दोन-तीन कडव्यांची कविताच स्वागताच्या फळ्यावर लिहिण्याची व विशेष म्हणजे ती वाचून दाखवण्याची गेल्या चार-पाच वर्षांची माझी सवय आहे. संस्थेत येणाऱ्याचं स्वागत करण्याची ही पद्धत आता रूढ झाली आहे. त्यादिवशीही पुढील ओळी लिहिल्या होत्या. त्या त्यांना वाचूनही दाखवल्या!

*कवी? नव्हे, महामानव!*
*करुणेचा झराच साक्षात, घरकुलात आला आज,*
*हात मायेचा घेऊन, महामानवच आला आज!*
*शब्दांतून होतो व्यक्त, त्या पलिकडेच तो असतो,*
*'कवी ग्रेस' म्हणती त्याला, त्या पलिकडेच तो असतो!*
*घरकुलाविषयी कळले, भेटण्यास येईन' म्हणाला,*
*लौकिक जगाचे संकेत, तोडूनच येथे आला!*

आता हे सारं आठवलं की माझ्या धाडसाचं व ग्रेस यांच्या सहनशीलतेचं व सौजन्याचं नवल वाटतं. दोन रात्र ग्रेस यांचा मुक्काम येऊरच्या बंगल्यावर होता. सकाळी उठल्यावर ''कधी नव्हे ती छान गाढ झोप लागली'' असं प्रसन्नपणे म्हणाले.

ग्रेस सदैव दुसऱ्याची काळजी करत असतात. कोल्हापूरच्या सरोज जोशी आमच्याबरोबर होत्या. येऊरला जाताना त्या हायवेवर थांबल्या. तेथून त्यांना बोरीवलीला बसनं जायचं होतं. बंगल्यावर गेल्यानंतर चार-चार वेळा ते ''सरोजबाईंना बस मिळाली असेल का? घरी पोहोचल्या असतील का?'' विचारत होते. जेव्हा, त्यांचा फोन लागला व त्या सुखरुप पोहोचल्याचे समजले तेव्हाच त्यांच्या जीवाला चैन पडलं. त्यांच्या माधवी, मिथिला या कन्या व राघव हा मुलगा मुंबईतच असतात. दररोज सकाळ-संध्याकाळ एकदा तरी फोनवर त्यांच्याशी बोलल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. ते त्यांच्याशी बोलत असतात तेव्हा ते कोणी मोठ्ठा कवी नसतात, एक हळवा बाप असतात. बाबांच्या जाहीर कार्यक्रमास जाऊन त्यांना ऐकण्याचा योग सहसा येत नसावा. २४ डिसेंबरच्या कार्यक्रमास माधवी आली होती. बाबांच्या भाषणानं ती भारावून गेली होती.

मधुमेहामुळे त्यांना केव्हा काय त्रास होईल सांगता येत नाही. कोणत्याही क्षणी रक्तातील साखर कमी होते तेव्हा त्यांची होणारी स्थिती पाहावत नाही. पटकन काही एकदम गोड पदार्थ खाल्ला की काही वेळानं ते सावरतात पण पुढच्या क्षणी काय होईल याची धास्ती वाटते. 'ग्लासमिया' का काही

असा तो विकार असावा. या स्थितीचा संबंध केवळ शारीरिक व्याधींशीच असावा असं नाही तर मनाच्या अस्वस्थेमुळेही असं होत असावं. २३ व २४ डिसेंबर या दोन्ही दिवशी नेमकं असं झालं व आम्ही सारे काळजीत पडलो की कार्यक्रम राहू दे, पण यांना काही झालं तर काय? थोडा वेळ गेला की ते सावरतात. त्यांची ती स्थिती पाहून वाईटही वाटतं व त्यामुळे मनावर मोठ्ठंच दडपण येतं.

स्पष्ट, स्वच्छ विचार व प्रामाणिकपणा हे ग्रेस यांच्या स्वभावाचे विशेष आहेत. '' 'ग्रंथाली'साठी मी आलो आहे. माझा सर्व वेळ त्यांच्यासाठी आहे'', असं ते म्हणाले व त्यानुसारच वागले. 'घरकुल'ला जाण्याबाबत अथवा येऊरला राहण्याबाबत बोलणं झालं तेव्हा सुदेश यांच्या अनुमतीनंच कार्यक्रम ठरवू असं म्हणाले. एवढेच नव्हे तर कार्यक्रमाची जी काही वेळ असेल त्यावेळेत मी कार्यक्रमाच्याच ठिकाणी असेन. २४ डिसेंबरला दुपारी ३.३० ते सायंकाळी १० पर्यंत ग्रेस मो.ह. विद्यालयामध्येच होते.

२४ डिसेंबरच्या कार्यक्रमात त्यांची मुलाखत हाच मुख्य भाग होता. पाणी, चंद्र, अंधार, चर्चबेल्स हे उल्लेख आपल्या लेखनात असतात त्याविषयी सर्वांच्या मनात कुतूहल असतं त्याविषयी काही सांगा अशी विनंती केली आणि ग्रेस बोलू लागले. एखाद्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणं त्यांचं बोलणं होतं. त्यांची गती हळूहळू वाढत होती. प्रवाहाच्या वाढणाऱ्या गतीमुळे जसा उभा राहणारा ओढला जातो तसं झालं. काही वेळात त्या प्रवाहाचा प्रपात झाला. आपण प्रवाहाबरोबर वाहत नसून एका जागी आहोत व आपल्यावर एक प्रपात कोसळतो आहे असं वाटत होतं. ग्रंथालीच्या कार्यक्रमास आलेल्या सर्वांनाच याचा प्रत्यय आला. मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दूमध्ये ग्रेस बोलत होते. ते भाषण करत नव्हते, ते बोलत होते. तो संवाद होता. त्यांच्या स्वराला एक लय होती. त्यात आरोह व अवरोह आपोआपच जाणवत होता. ते जे बोलत होते ते गद्य नव्हतं ती एक कविताच होती. ठरावीक शब्दांच्या प्रास व यमक साधलेल्या निश्चित ओळींची कडवी असं बाह्यांग असलेली रूढ अर्थाची ती कविता नव्हती. पण हृदयातून थेट ओठांवर आलेला तो उद्‌गार होता. ते जे बोलत होते ते काही त्यांनी तयार केलेलं भाषण नव्हतं. ते सारं उत्स्फूर्त होतं. 'उत्स्फूर्तता' हेच त्यांच्या कवितेचं मर्म आहे. 'तत्क्षणी' हे त्यांच्या जगण्याचं वैशिष्ट्य आहे. हृदय, मन पिळवटून ते बोलत असल्याचा अनुभव येतोच येतो. त्यामुळेच त्यांची कविता फॉर्मल किंवा कॅज्युअल नसते. विशिष्ट क्षणी त्यांची जी मनोवृत्ती असेल त्या क्षणांचा तो उद्‌गार असतो. त्यामुळे हे कडवे व त्याचा हा अर्थ, अशी कविता जाणण्याची जी आपली सवय असते त्याप्रमाणे ग्रेस यांच्या कवितेचा अर्थ लावता येत नाही. ''माझ्या कवितेचा अर्थ सांगण्यास मी बांधलेला नाही'' असं ग्रेस म्हणतात ते याच अर्थानं असावं. त्यांची कविता काय किंवा गद्यलेखन काय, त्यांचं हेच मर्म आहे. शास्त्रीय गाणं फारसं कळत नसलेली व्यक्ती गाणं ऐकायला बसली तर एखादा राग त्याचं स्वरूप वैशिष्ट्यं काही कळत नसलं तरी आपण काहीतरी छान ऐकतो आहे असं त्या व्यक्तीला जाणवतं, ते 'छान' म्हणजे नेमकं काय त्याला सांगता येत नाही. ग्रेस ऐकताना नेमकं असंच होतं. त्यांचा तो संवाद म्हणजे 'समजणं' व 'जाणवणं' या प्रकारातील असतो.

सामान्यत: कवी आपली कविता श्रोत्यांना ऐकवतात. त्यांच्याशी गप्पा-गोष्टी करत ते कवितेविषयी बोलतात. त्या मैफलीत कोणी अन्य कवी असेल तर त्याची कविताही ऐकून घेतात. कविता व त्यातील विषयावर चर्चाही होते. ग्रेस कधी कुठल्या काव्यसंमेलनात जातील व आपल्या दोन-चार कविता वाचून-म्हणून दाखवतील असं होत नाही. लेंगा, झब्बा व शबनम असं कवींचं जे रूप आपल्या मनात असतं, ग्रेस त्यापासून अलिप्त आहेत. टी-शर्ट किंवा स्वत: डिझाईन केलेला कुर्ता त्यांच्या अंगावर असतो. ''ही माझी कवितांची वही, आपण त्यावर अभिप्राय द्या.'' असं त्यांना म्हणण्याचं धैर्य कोणाला होईल असं वाटतं नाही.

मराठी व सौंदर्यशास्त्राचे प्रोफेसर असलेले ग्रेस व त्यांची कविता विशिष्ट अशा संप्रदायात बसणारे नाही. साम्य जर शोधायचं झालं तर जी.ए. कुलकर्णी व ग्रेस यांचं साहित्य व व्यक्तिमत्त्व यांत शोधता येईल. या क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती ते करतही असतील. दोन दिवसांच्या त्यांच्या सहवासाचा मला जो आनंद झाला तो व्यक्त करणं एवढाच या लेखाचा हेतू आहे.

स्वाक्षरी व फोटोमुळेही त्यांचं स्वास्थ्य बिघडतं. सामान्यत: मोठ्या मान्यवर व्यक्तींना या प्रसंगांना सारखंच सामोरं जावं लागतं. काहींना अशा स्वाक्षऱ्या देताना, फोटो काढताना आनंदही वाहतो. ग्रेसना हे फारसं आवडत नाही. म्हणजे ते कोणाला हाकलून देतात असं नाही. दुसऱ्या कोणाचं पुस्तक 'स्वाक्षरीची वही' यावर स्वाक्षरी द्यायला ते तयार नसतात. पण अनेकदा प्रसन्न मनानं ते स्वाक्षरीही देतात व फोटोलाही उभे राहतात. ठाणे येऊर मुक्कामात तीन-चार कुटुंबांनी त्यांच्या भोजन-न्याहरीचं काम आनंदानं केलं. अपर्णा पटवर्धन त्यांच्यासाठी भोजन घेऊन आल्या. गाडीचे ड्रायव्हर कामत जणू त्यांच्या कुटुंबातीलच. कामतांची लेकही येऊरला आली. हा मोठ्ठा कवी पाहायला तरी मिळावा या हेतूनं. ग्रेसनी तिच्याशी चांगल्या गप्पा मारल्या. स्वाक्षरीसाठी कागदाची शोधाशोध सुरू झाली. ग्रेस यांनी तिचा तळहात हळुवारपणे हाती घेऊन त्यावरच स्वाक्षरी केली! तिच्या बाबांशी तर बोललेच व त्याचा शर्ट, त्याची बटणं याचं कौतुक केलं! काही मिनिटांच्या परिचयात, वादळासारखा इतरांना भासणारा कवी कोणासाठीही वसंतकालीन झुळूक होतो याचा प्रत्यक्षच अनुभव मला आला. या घटना दंतकथा वाटतील, पण आपल्याच हयातीत दंतकथा बनून राहिलेल्या या महाकवीचा, महामानवाचा सहवास आम्हा ठाणेकरांच्या भाग्यात होता हे खरं!

**अविनाश बर्वे**
बी/१०६, सुचेता, सिद्धेश्वर तलाव,
पाटीलवाडी, ठाणे-१.
फोन : २५३३ ७२५०

# सुगंध उरले, सुगंध उरले

## ना.घ. देशपांडे यांची निवडक कविता

अरुणा ढेरे

**ना.घ. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, वाचकदिनी प्रसिद्ध झालेल्या आणि अरुणा ढेरे यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील त्यांची प्रस्तावना...**

ना.घ. देशपांडे या नावाची मराठी काव्यपरंपरेत एक स्वतंत्र अशी मुद्रा आहे. या कवितेने मर्मज्ञ रसिकांच्या अभिरुचीची संपन्नता वाढवली आहे आणि मराठी भावकवितेच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून एकूण मराठी कवितेच्या संदर्भातही तिने एक लक्षणीय स्थान प्राप्त केले आहे.

२००९-२०१० हे ना.घ. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष. विदर्भातल्या जुन्या मेहेकर तालुक्यात, सेंदूरजन या लहानशा गावात आपल्या आजोळ घरी ना.घ. देशपांडे यांचा जन्म झाला. आपल्या जन्मकुंडलीतच कवित्वाची देणगी देणारे ग्रह आहेत अशी त्यांची भावना होती. 'खूणगाठी' ह्या त्यांच्या कविता-संग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांनी आपली कुंडली देत म्हटले आहे की 'शुक्र लग्नांशात असल्याने कवित्वाची जन्मजात प्रवृत्ती असावी. तो नवमेशही असल्याने पित्याकडून ती उत्पन्न झाली असे दिसते.' महाकवी गटे, नाटककार देवल, आचार्य अत्रे आणि तांबे, बालकवी यांसारखे कवी कुंडलीत कन्येचा शुक्र घेऊन आले असल्याचा उल्लेख ना.घं.नी आवर्जून केला आहे. 'ज्योतिषशास्त्रावर विश्वास असणाऱ्या तज्ज्ञांनी काय ते ठरवावे' असे ना.घं.नी पुढे म्हटले आहे खरे, पण कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत प्रारंभीच आपली जन्मकुंडली देणाऱ्या ना.घं.चा स्वत:चा विश्वास असाच असला पाहिजे, की आपली कवित्वाची प्रवृत्ती आपल्या जन्मकाळच्या ग्रहस्थितीमुळे आपल्याला लाभली आहे.

कवी काय किंवा कोणीही कलावंत काय, तो आभाळातून पडत नाही. त्याच्या अनुवंशातून, परिसरातून आणि त्याच्या भोवतीच्या वास्तवातून त्याच्या व्यक्तित्वाची मळणी होत असते. ना.घं.च्या श्रद्धा-विश्वासांचे जग काहीही असो, त्यांच्या कवी म्हणून जगण्याच्या आदिबंधांची काहीशी कल्पना त्यांच्या आत्मपर लेखनातून आणि त्यांच्या काही कवितांमधून आपल्याला येऊ शकते. त्यांच्या लौकिक चरित्राशी संबंधित आणि त्यांच्या आंतरचरित्राशी संबंधित असा स्थळकाळाचा, घटना-प्रसंगांचा, इतिहास-भूगोलाचा आणि वाङ्मयीन पर्यावरणाचा विचार आपण त्यांच्या आणि त्यांच्या समकालीन कवितेच्या संदर्भात करू शकतो.

### पैतृक वारशाचा विस्तार आणि विकास

ना.घं.चे बालपण बहुतांश सेंदूरजनला आजोळी गेले. आई-वडील खेर्ड्याला राहत. वडील देशभक्तही होते आणि देवभक्तही होते. सावरकर आणि लोकमान्य टिळक या दोन्ही जहाल विचारांच्या लोकनेत्यांविषयी त्यांच्या मनात फार प्रेमादर होता. देशभक्तिपर अशी विपुल कविता त्यांनी लिहिली.

ते रामदासी संप्रदायाचे होते आणि काही साधुपुरुषांचे भक्त होते. त्यांचा आवाज गोड होता आणि स्वत: रचलेल्या आरत्या ते देवळात गात असत. पदांच्या स्वरूपाची पुष्कळ रचना त्यांनी केली होती. आबाराव देशपांडे नावाचे त्यांचे एक मित्र होते. तेही कविता करत आणि गात असत.

ना.घं.ना कविता मिळाली ती अशी वडिलांकडून. रक्तातून. अर्थात हा पैतृक वारसा मूळ काव्यप्रतिभेपुरताच होता असे म्हटले पाहिजे. कारण ना.घं.च्या कवितेचा आशय हा कायमच सर्वस्वी त्यांचा स्वत:चा आणि स्वतंत्र राहिला. वडिलांच्या देश-देवभक्तीची सावली त्या कवितेवर प्रारंभीही कधी नव्हती. समजू लागल्यापासून तर ना.घं.नाही स्वत:च्या स्वतंत्रतेची जाणीव स्पष्ट झाली असावी. वडिलांच्या रचनांची बाडे जपून ठेवणे आणि त्यांच्याकडे पुन्हा वळणे हेही ना.घं.कडून घडले नाही ते बहुधा त्यामुळे. किंबहुना, त्यांच्या कवितेची स्फुरणे अगदी त्यांची अशी राहिली. एका परीने, वडिलांच्या पारंपरिक वळणाच्या कवितेला दूर ठेवत त्यांनी वडिलांकडून मिळालेल्या वारशाचा अगदी मन:पूत विस्तार केला असेच दिसते.

शिवाय, ही गोष्ट नकळत घडलेली नाही. आपण काय लिहितो आहोत याची जाणीव ना.घं.ना स्पष्ट होती. वडिलांना आणि त्यांच्या मित्रांना ते स्वत:च्या कविता म्हणून दाखवत तेव्हा ते दोघे उत्सुकतेने ऐकत, पण वडील समजावत, 'देवावर कविता कर. शृंगारच हवा असेल तर कृष्णावर कर.' वडिलांना जे हवे होते ते त्यांना मुलाच्या

कवितेत सापडत नसे. त्या कवितेला देवभक्तीचा किंवा देशभक्तीचा उत्कट स्पर्श नव्हता. आलंबन नव्हते. हे लक्षात येऊन वडील विषण्ण होत. पण स्वत:ला वाटते तेच गाण्याचा ना.घं.चा हट्ट होता. पुढे त्यांनी तो हट्ट कवितेतून प्रकट करताना म्हटले आहे –

*हेच गा अन् तेच गा,*
*का घालता ही बंधने?*
*मोहना माझी असावी,*
*ती कुणाची अंकिता?*

अशा प्रकारची प्रातिभ स्वायत्ततेची जाणीव स्पष्टपणे आणि आरंभापासून असल्यामुळेच ना.घ. स्वत:च्या कवितेला अनुकरणापासून, संकेतशरणतेपासून आणि गतानुगतिक-तेपासून दूर ठेवू शकले. मळल्या वाटेवर पाय ठेवणे नाकारू शकले. ज्या काळात कुटुंबातील वडीलधाऱ्यांचा नवीन पिढीला दरारा आणि धाक वाटत असे आणि आज्ञापालन हेच मुलांचे कर्तव्य असे, त्या काळात समाजाच्या दृष्टीने नटरंगी शृंगाराची कविता अंत:स्थ बांधिलकीने लिहिणे ही गोष्ट फार मोठी होती. ना.घं.नी ती स्वाभाविक आंतरप्रेरणेने साध्य केली आणि कवितेचा आनुवंशिक वारसा विस्तारला. एवढेच नव्हे, तर त्याचे विकसनही केले.

**परिसराशी सर्जक नाते**

खेर्डा, सेंदूरजन आणि मेहेकर ही विदर्भातली तीन गावे ना.घं.च्या कवितेला नेपथ्यासारखी आहेत. खेर्डा हे देशपांडे कुळाचे वतनाचे गाव. सेंदूरजन हे आजोळ. आजोळी चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर ना.घ. मेहेकरला माध्यमिक शिक्षणासाठी आले. ते त्यांचे दीर्घकाळच्या वास्तव्याचे गाव. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते मेहेकरलाच राहिले. या तीनही गावांच्या भूगोलाचा अमिट असा ठसा ना.घं.च्या कवितेवर उमटला आहे.

कलावंताचे त्याच्या परिसराशी जे नाते असते, त्या नात्याचा उच्चार करताना कवी बोरकरांनी म्हटले आहे, की 'काश्मीरमधल्या चिनारच्या झाडाला फक्त स्वत:चीच भूमी लागते, तशीच ती सृजनशील माणसालाही लागते. तिच्यात त्याची मुळं जितकी खोलवर जातात, तितका तो आपल्या शाखा आकाशात अधिक दूरवर फाकू शकतो आणि आपल्या खऱ्या ऐश्वर्याने बहरू शकतो.' बोरकरांच्या स्वत:च्या कवितेप्रमाणे ना.घं.च्या कवितेबाबतही ही गोष्ट फार खरी आहे.

सेंदूरजनची प्रचंड ओसाड गढी, गावालगतची पाताळगंगा नदी आणि तिच्या पात्राजवळचे पाताळकुंड, शिवाची आणि योगेश्वरीची मंदिरे, आजोळचा प्रचंड वाडा, सीतान्हाणी, नदीकाठची आंब्याची झाडे, मधेच दिसणारे हिरवे मैदान, तिथे कधी दिसणारे मोर, कधी हरणे, कधी वाघ, बेलटेकडी आणि तिच्यावरचा मोकळा माळ... हा सगळा निसर्गसमृद्ध परिसर त्यांच्या कवितेत अधूनमधून जिवंतपणे दिसत राहिला आहे.


सेंदूरजनच्या वाड्यालगत नव्या बगीच्यातली मोट, शेतात बसवलेला मेंढ्यांचा भला थोरला कळप, आजोबांच्या घराजवळच्या मामांच्या वाड्याच्या ओट्यावरून दिसणारे गढीच्या टोकावरचे वाळके-खुरटलेले झाड, गावातल्या कुणा गृहस्थाने पाळलेले हरीण आणि त्याला गळामिठी घालणारी त्यांची लहान मुलगी- संवेदनांनी भरून येत टिपलेली अशी कितीतरी दृश्ये ना.घं.च्या कवितेत स्वाभाविक सौंदर्याने बहरून उतरली आहेत.

*ही मोट भरे भराभरा*
*चढे करकरा जी*
*विहिरीत बघा वाकुनी*
*जरा धाकुनी जी*
*पाण्यात लई भोवरे*
*फेस गरगरे जी* ('मोटकरी')

किंवा

*काळ्या गढीच्या जुन्या ओसाड*
*भिंतीकडे*
*आलीस तू एकटी बांधून सारे चुडे*
('काळ्या गढीच्या जुन्या...)

अशी रात्रीच्या अंधारात गढीजवळ प्रियकराला भेटणारी अभिसारिका,
किंवा




**सुगंध उरले, सुगंध उरले**

**ना.घ. देशपांडे यांची निवडक कविता**

संपादन : अरुणा ढेरे

**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

*हरिणीस सखूचा लळा*
*कि पडते गळा, जी* (सखू)

अशी परस्परांना लळा लागलेली सखूची आणि हरिणीची जोडी
किंवा

*या झाकळलेल्या सबंध खोऱ्या मधी*
*कुजबुजते गाणे धुंद एकली नदी*
.....
*या निजल्या मेंढ्या उभ्या उभ्यानं जणू*
*हळुवार लावणी हळूहळू गुणगुणू*
(धनगरी गाणे)

असा रात्रीच्या चांदण्यात मेंढरांनी भरलेल्या शेतशिवाराचा परिसर. ना.घं.च्या कवितेत अशी कितीतरी चित्रे उमटली आहेत. चित्रे त्यांच्या स्मरणातल्या गावांची, माणसांची, परिसराची.

त्या दृश्यांना एक प्रकारची आकर्षणशक्ती लाभली आहे. बालकवींप्रमाणेच ना.घं.जवळ अनुभवाला संवेदनात्मक जाग आणता आणता भावमंत्रित

वातावरण निर्माण करण्याचे प्रतिभासामर्थ्य आहे. हे सामर्थ्य त्यांना लाभले ते मुख्यत: सेंदूरजनच्या परिसरात. गव्हाच्या पिकांमधल्या पाऊलवाटांवरून चालताना, योगीश्वरीच्या पडक्या देवळाच्या खांबांशी संधिकाली डोळे मिटून बसताना, हरिण-टेकडीवर झळकत्या चांदण्यांखाली स्वैर भटकताना आणि पाताळकुंडाच्या पाण्यावर हलणारी मालतीची फुले पाहताना ना.घं.ची तंद्री लागे आणि ती तंद्री कवितेत संक्रमित होत जाई. सेंदूरजनला त्यांनी आपल्या 'ऐनीचे नंदनवन' म्हटले आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचे तर ते त्यांच्या 'कवितांवर मोहमंत्र घालणारे गाव' होते.

ना.घं.च्या मनातली स्त्रीरूपेही याच परिसरात त्यांनी न्याहाळलेली. ऐने लावलेल्या चोळीवर पाच पाखांचा पदर घेतलेली कुणी, देवळात सांजवाती लावणारी कुणी, काळी चंद्रकळा नेसून मिरवणारी कुणी, माघामधल्या थंडीत काकडलेली कुणी, शेतात गोफण फिरवत पाखरे उडवणारी कुणी, बारवेच्या काठावर गळ्यात हिरवी पोत मिरवत, लालबुंद कुंकवाची कोर रेखून येणारी कुणी... प्रत्यक्षात दिसणाऱ्या रूपांवर कल्पनेचा तरल हात फिरत जाई.

उन्हाळ्याच्या सुटीत आजोळी आलेला तरुण मुलगा आजोळच्या वाड्याच्या प्रचंड मोठ्या दारात उभा राही. समोरून पाणी भरायला येणाऱ्या-जाणाऱ्या तरुण मुली दिसत. डोक्यावर, कमरेवर घागरी घेतलेल्या, गळ्यात पुतळ्यांची माळ घातलेल्या, पाण्याने कटी-खांदी भिजून गेलेल्या त्या बायकांकडे दृष्टी वारंवार जात राही. भल्या पहाटे पायांतल्या तोरड्यांचा आणि कळशीवर आपटणाऱ्या तिच्या बांगड्यांचा आवाज त्या तरुण कवीच्या काना-मनात भरून राही. कल्पनेला हळुहळू रंग चढत जाई. प्रत्यक्षावर तो रंग अशा कोमलतेने चढे, की कवितेत सौंदर्याची मधुरता गाढ भरून येई.

ही मधुर मोहिनी दूर सरकली की ना.घं.च्या कवितेचे रंगच फिके, विटल्यासारखे होतात आणि त्यांच्या भाषेचा विस्कळपणा एकदम जाणवू लागतो. जोवर ती मोहिनी असते तोवर मात्र त्यांची कविता रूप-रस-गंध-नाद आणि चित्र यांचे एक मधुजाल पसरत राहते आणि रसिक स्वखुशीने तिच्या स्वाधीन होतो.

**कथात्म दीर्घ कविता**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दीर्घ कवितेकडे अनेक कवी आकर्षित झाल्याचे दिसतात. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, कौटुंबिक अशा घटना-प्रसंगांचे नाट्यपूर्ण आणि काव्यात्म कथन करणारी कविता या काळात बहराला आली. अंतर्गत रचनेचे विविध प्रकार कवींनी तिथे हाताळून पाहिले.

'विलापिका' हे ग.त्र्यं. माडखोलकरांचे पुस्तक हाती लागले आणि वयाची विशी ओलांडण्यापूर्वीच ना.घं.नी स्वत:च्या मातृवियोगाच्या अनुभवातून एक दीर्घ कविता लिहिली. पुढे त्याच प्रकारच्या पण वेगळ्या अनुभवांतून स्फुरलेल्या आणखी तीन कविता त्यांच्याकडून लिहिल्या गेल्या. ऐन तरुणपणातल्या या रचना त्यांनी फार उशिरा प्रकाशित केल्या. 'कंचनीचा महाल' हे त्यांचे चार दीर्घ कवितांचे पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा ते सत्याऐंशी वर्षांचे होते.

ना.घं.च्या चारही दीर्घ कविता त्यांच्या स्फुटकवितांप्रमाणेच अगदी साध्या, अकृत्रिम बाजाच्या आहेत. त्या चारही कवितांमधली चटका लावणारी कविता आहे 'गिरिजेचा संसार'. कविता म्हणून तिच्यातली कथात्मता, निवेदनशैली आणि संदिग्धता लक्षणीय आहे. तिच्या नायिकेच्या आयुष्यकहाणीत एक नाट्य आहे. निरागसपणाच्या कुशीत झोपलेले एक दु:ख आहे. परिस्थितीचा एक समंजस पण यातनामय स्वीकार आहे आणि तिच्या कथनाचा ऐकणाऱ्या तरुण मुलावर होणारा परिणाम तर विलक्षण नाट्यपूर्ण आणि संदिग्ध आहे.

काव्यलेखनाच्या प्रारंभकाळातली असूनही ना.घं.च्या काव्यशैलीचे विशेष दाखवणारी ही दीर्घ कविता तिच्यातल्या भावनाट्याच्या परिणामकारकतेचा नमुना म्हणून समोर ठेवता येते.

**परंपरा आणि नवता**

१९५४ साली 'शीळ' हा ना.घं.चा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. पण 'शीळ' हा त्यांच्या गाजलेल्या कवितेची ध्वनिमुद्रिका १९३२ सालीच प्रसिद्ध झाली होती आणि त्यापाठोपाठ त्यांच्या पाच कविता ग.ल. ठोकळांनी संपादित केलेल्या 'सुगी' या संग्रहात १९३३ साली प्रसिद्ध झाल्या होत्या. 'शीळ'नंतर १९६३ साली 'अभिसार' प्रसिद्ध झाला. 'खूणगाठी' १९८५ साली, 'गुंफण' १९९६ साली आणि 'कंचनीचा महाल' हाही १९९६ सालीच प्रसिद्ध झालेला संग्रह. 'शीळ' ही कविता लिहिली गेली ती १९२९ साली. खाजगी मैफलींत तिचे वाचन-गायनही होत राहिले होते. तेव्हा १९२९-३० ते १९९६ असा जवळपास सदुसष्ट वर्षांचा ना.घं.च्या कवितांचा काळ आहे. ना.घं.चा मृत्यू २००० मधला. ते जवळजवळ अखेरपर्यंत कवितालेखन करत होते हे लक्षात घेतले तर सत्तर वर्षांचा प्रदीर्घ काळ हा कवी निर्मितीशील होता असे दिसते.

ना.घं.नी कवितालेखनाची सुरुवात अगदी कोवळ्या वयापासून केली असली तरी 'शीळ' हाच त्यांच्या कवितेचा खऱ्या अर्थाने प्रारंभ मानावा लागेल. 'शीळ' लिहिणारे ना.घ. वयाच्या ऐनीतले अवघे वीस वर्षांचे तरुण होते. जवळ ऐकलेले-वाचलेले होते ते बरेचसे धार्मिक, पारंपरिक वळणाचे साहित्य होते. आधुनिक साहित्य त्यांनी वाचले नसेल असे नाही, पण त्या साहित्याचा फारसा परिणाम त्यांच्या पिंड-प्रकृतीवर झाला नाही. पारंपरिक साहित्याचाही नाही.

ना.घं.ची कविता त्यांच्या पूर्वकालीन कवितेपेक्षा अगदी निराळी आहे. केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, तांबे यांची मुख्य प्रवाहातली कविता त्यांच्या काळाच्या दृष्टीने

अगदी निकटच होती. समकालीन होते रविकिरण मंडळातले कवी आणि त्यांची कविता. तो तर मंडळातल्या कवींचा बहराचा काळ होता. शिवाय, पु.शि. रेगे होते, बोरकर होते आणि कुसुमाग्रजही होते. 'सुगी'मधून ना.घं.च्या कविता प्रसिद्ध झाल्या, त्याच वर्षी म्हणजे १९३३ साली बोरकरांचा 'प्रतिभा' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्याच वर्षी कुसुमाग्रजांनी आपल्या 'जीवनलहरी' छोट्या स्वरूपात प्रसिद्ध केल्या.

पुढे 'फुलोरा'मधून प्रसिद्ध झालेल्या कविता पु.शि. रेगे १९३० ते ३६ या काळातच लिहीत होते. संजीवनी, इंदिरा यांच्याही कवितांचा हा प्रारंभिक काळ होता.

ना.घं.ची कविता याच काळात लिहिली जात होती, पण तिची धाटणी, तिच्या अभिव्यक्तीची रीत आणि तिच्यातले आशयद्रव्य या सगळ्याच बाबतींत ती अगदी स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण होती. इतकेच काय, पण 'सुगी'मधल्या इतर ग्रामीण कवितांमधूनही तिचा आवाज वेगळा उमटत होता, वेगळेपणाने लक्षात येत होता.

याचे कारण ना.घं.च्या कवितेची स्फुरणे अगदी निराळी होती. ना.घ. हे आपल्याच परिसरात, आपल्याच ठायी रमून, आपल्याच तंद्रीत गाणारे कवी होते. बालकवींनी 'फुलराणी' कवितेच्या शेवटी लिहिले आहे, 'गुंगत गुंगत कवि त्या ठायी, स्फूर्तीसह विहराया जाई, त्याने तर अभिषेकच केला, नवगीतांनी फुलराणीला.' 'फुलराणी'ऐवजी 'सरस्वती' एवढ्या एका शब्दाचा बदल करून ना.घं.च्या कवितेबद्दल बालकवी असेच म्हणाले असते असे वाटते. हा कवी मुळातच बहिर्मुख नसलेला. आपल्या परिसराशी घट्ट बांधून असलेला आणि विचारांपेक्षा अधिक भावपोषकतेला सन्मुख होणारा. तंद्रीत बुडून लय लागून गाणारा. त्याच्या कवितेचे नाते समकालीन कवितेशी फारसे नाही आणि समकालीन सामाजिक, राजकीय अथवा सांस्कृतिक बदलांशीही नाही.

**एकाग्र, अंतर्वक्र कविता**

मराठी कवितेच्या एक शतकाच्या वाटचालीत जवळजवळ साठ-सत्तर वर्षांइतका दीर्घ काळ ना.घ. कविता लिहीत राहिले. पण मराठी कवितांमध्ये येत गेलेले नवनवे प्रवाह, तिच्यात होणारी महत्त्वाची स्थित्यंतरे आणि परिवर्तनानंतर खुल्या झालेल्या नव्या वाटा, नव्या दिशा, नवे कवी यांचा कोणताच विशेष परिणाम ना.घं.च्या कवितेवर नाही. ना मर्ढेकरांचा, ना पु.शि. रेग्यांचा, ना खानोलकरांचा ना सुर्वे-चित्रे-कोलटकरांचा. ना महानगरी कवितेचा आणि ना दलित कवितेचा. अतिशय एकाग्रपणे ना.घ. स्वत:चीच कविता लिहीत राहिले.

त्यांची कविता एकाग्र होती ती दोन अर्थांनी. एक तर कवीने कवितेखेरीज इतर काहीही लिहू नये असे त्यांना वाटत होते. आयुष्याच्या उतारावर त्यांनी 'फुले आणि काटे' या नावाने जे थोडे आत्मपर स्मरणरंजन केले ते सोडले तर खरोखरच ते एकाग्रपणे फक्त कविताच करत राहिले. साहित्याच्या इतर रूपांचा मोह त्यांनी कधी बाळगला नाही.

एकाग्रतेचा आणखी एक संदर्भ त्यांच्या आशयकेंद्राशी आहे. एकाच केंद्राला लक्ष्य करून ना.घ. लिहीत आले. व्यामिश्र जीवनानुभवांकडे ते कधी वळले नाहीत. मूळची वृत्ती बहिर्मुख नव्हे. कवितेचा अवकाश तिने मर्यादित केला तरी तिच्यामुळे कवितेची साधना आत्मलीन होऊन करण्याचे बळ मात्र ना.घं.ना मिळत राहिले. एकाग्रतेची ही फार विधायक बाजू म्हटली पाहिजे.

वाढत्या वयाबरोबर आणि जगण्यातून गोळा झालेल्या भल्याबुऱ्या, सुखदु:खमय अनुभवांबरोबर त्यांच्या कवितेने स्वत:ला अनुरूप असे काही बदल आपलेसे केले खरे, पण कवीच्या एकूण काव्यदृष्टीत फारसा बदल झाला नाही. निसर्गाची आणि प्रेमाची अव्याजमनोहर रूपे प्रकट करण्याची ऊर्मी तीच राहिली. अनुभवाचे स्वप्नतरल रंग टिपण्याची रीत तीच राहिली आणि अभिव्यक्तीची धाटणीही तीच राहिली.

त्यांच्या कवितेला रसिक संवादाचीही फारशी ओढ नाही. कवी आणि वाचक किंवा रसिक यांच्यामध्ये वाटून घेतलेला जीवनानुभव ती प्रकट करत नाही. ती स्वत:त रमलेली कविता आहे. जसे ना.घ. कवितेच्या धुंदीत राहणारे आणि वास्तवावर स्वप्नसुंदरतेची झळझळ पसरणारे कवी तसे त्यांचे समकालीन बोरकरही होते. पण बोरकरांच्या कवितेला भारतीय तत्त्वज्ञानाची, मिथकांची आणि जीवनमूल्यांची एक भव्योदात्त अशी पार्श्वभूमी मिळाली आणि रसिकांच्या मनात त्या तत्त्वज्ञानाची, त्या मिथकांची, त्या जीवनमूल्यांची जी ओढ होती, त्या ओढीमुळे आपोआपच त्यांची कविता बहिर्मुख नसूनही सर्वस्पर्शित्वाचे एक निराळे सामर्थ्य प्रकट करत गेली. ना.घं.च्या कवितेतली धुंद ही जीवनजाणिवांच्या एका सीमित प्रदेशातली धुंद आहे. तिचे सामर्थ्य सर्वस्पर्शित्वाचे नाही तर अंत:स्पर्शित्वाचे आहे. तलस्पर्शित्वाचे आहे. त्या कवितेच्या धुंदीची जात निराळी आहे आणि त्या धुंदीचा संबंध कवीच्या काव्यवृत्तीशी आहे.

ना.घं.नी आयुष्यात दोन निष्ठा प्रबळपणे बाळगल्या. एक प्रीतीची आणि दुसरी कवितेची. या दोघींचा ते सतत ध्यास घेत राहिले. चिंतन करत राहिले. आयुष्याच्या अगदी उतरणीवर असताना त्यांनी लिहिले, की 'बाहेरच्या माणसांना हे काहीच उमगत नाही. सारे आतल्या आतच. त्याचा थांग माझ्या कवितावरून घ्यावा. जास्त सांगावेसे वाटत नाही. दारे बंद आहेत.'

**काही कवितांच्या जन्मकथा**

दारे बंद करून आपल्या प्रीतीला आणि कवितेला मनात घोळवत राहिलेल्या ना.घं.नी आपल्या आतल्या ध्यासविषयांचे काही जुजबी आणि पृष्ठस्तरीय असे तपशील रसिकांपुढे ठेवले आहेत. उदाहरणार्थ, त्यांच्या काही कवितांच्या जन्मकथा त्यांनी सांगितल्या आहेत.

सेंदूरजन गावाच्या पश्चिमेच्या सटवाई नावाच्या शेतात प्लेगच्या साथीत सगळे

राहायला गेले. साथीच्या भीतीने शाळा बंद झाली आणि गढीच्या चिरेबंद एकांतातून मोकळ्यावर रानात राहायला मिळाले. झोपडीबाहेर क्षितिजापर्यंत रंगांची आरास दिसायची. ना.घं.नी लिहिले आहे, ‘जमिनीचा काळा रंग, त्यावरील पाणभऱ्या गव्हाचे मनोरम हिरवे चौकोन, करडीच्या फुलांनी नटलेली सोनेरी वनश्री, पलीकडे कापणी झालेल्या ज्वारीच्या खुंटांची समांतर सुंदर रेषांची रांगोळी, मान उंच करून डोकावून पाहणारे ठिकठिकाणचे वृक्ष, लांब अंतरावर कोणाची तरी वाट पाहत कधीची उभी असलेली सर्वात उंच काटेशेवरी, पिवळसर टेकड्या, सर्वांना कवेत धरणारे दूरचे गोल क्षितीज हे सर्व पाहून मन तृप्त झाले.’

या आणि अशा दृश्यांच्या छाया ‘गिरिजेचा संसार’सारख्या दीर्घ कवितेत तरळतात. ‘काळीत दिसे हीवरा, गहू हरबरा जी’ अशा ओळीओळींमधून हलतात आणि ‘ही झुडपे, झाडे, रानवेल साजरे, चांदणे हिवाळी मंद धुंद झांजरे’ अशा वर्णनामधूनही दाटलेल्या दिसतात.

ना.घं.च्या मेहेकरच्या घराजवळ कुणी एक गोरी मुलगी राहत होती. तिच्याकडे त्यांची दृष्टी सारखी वळत असे. ती दृष्टिआड झाली तरी मनात तिची रंगीत चित्रे उमटत राहत. एकदा, मामांबरोबर त्यांच्या शेताची पाहणी करायला ते निघाले असताना दोघेही पैनगंगा नदीच्या काठाशी आले. आभाळात सांजेचे ढग होते. बगळ्यांचा एक थवा दिसत होता आणि नदीवर काही बायका कपडे धूत होत्या. बऱ्याच जणी काम आटोपून परत फिरल्या, पण एक प्रौढ तरुण मुलगी मात्र पाठमोरी धुणे धूत राहिली. नदी ओलांडताना ना.घं.ना ती सन्मुख झाली तर तीच ती होती. शेजारघरातली, मनाला ओढ लावणारी. पुढे कित्येक दिवस तीच ध्यानीमनी दिसत राहिली आणि एक दिवस त्या चित्रदर्शनाची कविता कल्पनेचा हात धरून आली - ‘नदीकिनारी’.

*नदीकिनारी, नदीकिनारी, नदीकिनारी गऽ*
*जरा निळ्या अन् जरा काजळी*
*ढगांत होती सांज पांगली*
*ढवळी ढवळी वर बगळ्यांची संथ भरारी गऽ*

लग्नाच्या अनुभवामधून जाताना वयाच्या तेरा वर्षांपासून अगदी पदवी परीक्षेपर्यंतच्या वर्षांमधले मुली पाहण्याचे प्रसंग ना.घं.नी लिहून ठेवले आहेत. त्यातल्या एका प्रसंगात मुलीला होकार द्यावा की नकार हेही कळेना. त्या अस्वस्थ दोलायमान स्थितीचे, मनातल्या खळबळीचे चित्र त्यांच्या एका कवितेत उमटून आले- ‘कोण कुठे आहेस तरी’

*पुरे तुझी अव्यक्त तऱ्हा*
*तुलाच भुलला जीव पुरा*
*कधी, सांग, येशील घरा*
*तुझेच ललिते, अधीरतेने*
*चित्र चिंतितो परोपरी*
*- कोण कुठे आहेस तरी!*

‘यौवनामध्ये कधीचा धुंडतो मी, आवडीचे फूल कोठेही फुलेना’ ही ‘शोध’ नावाची कविताही बहुधा त्याच काळातली असावी.

एका मध्यरात्री जाग आली आणि गॅलरीच्या कठड्याशी येऊन ना.घ. बराच वेळ उभे राहिले. एक प्रकारची तंद्रीच लागली. पत्नी शांता जागी झाली आणि जवळ येऊन उभी राहिली. ती रात्रीची शांतता, निळेकाळे आभाळ, पावसाच्या सरी, अंगणात फुललेला निशिगंध आणि प्रिय पत्नीची जवळीक- ‘तुझ्या माझ्यात, गऽ’ या कवितेचा जन्म तिथे झाला.

*आज आहे सखे*
*निशिगंधात गंध*
*श्वसनाचा प्रबंध*
*तुझ्यामाझ्यात गऽ*
*आज आल्यात गऽ*
*पावसाच्या सरी*
*भावनेच्या भरी*
*तुझ्यामाझ्यात गऽ*

‘अजून’ नावाच्या आणखी एका कवितामागे त्यांच्या आणि पत्नीच्या अतिगाढ सुखद सहवासाची एक कोवळी आणि मधुर आठवण आहे. ‘अपुरी झोप’ नावाच्या एका कवितेतही चाफ्याने सुगंधित केलेल्या अशाच रात्रींची ओवणी आहे. ना.घं.च्या अशा अनेक कवितांमधून त्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या व्यक्तिगत दृश्यांची, प्रसंगांची कधी स्पष्ट तर कधी अर्धस्फुट चित्रे उमटलेली आहेत. पण लौकिक आयुष्यातल्या अशा संदर्भांचा कवितेशी असलेला धागा उलगडला तरी कवितेचा आशय त्यापलिकडेच उरतो. त्याचे धागे गुंतलेले आहेत ते ना.घं.च्या कल्पनेने पाहिलेल्या अनेक भास-आभासांशी, त्यांच्या स्वभावाशी, प्रवृत्तिधर्माशी, त्यांच्या जीवनधारणांशी आणि काव्यदृष्टीशी. त्यांच्या कवितेची पृथगात्मता या साऱ्यामधून सिद्ध झाली आहे.

**कवितेचे स्वरूप**

ना.घं.ची कविता मुख्यत: प्रेम गाणारी आहे. प्रेम हा त्यांच्या कवितेचा एकमेव विषय नाही, तरीही या कवितांच्या केंद्रस्थानी आहे ते प्रेम आहे. निसर्गाच्या सान्निध्यात बहरणारे प्रेम आहे. शारीर आणि मानस या दोन्ही पातळ्यांवरचे प्रेम ना.घ. नि:संकोच व्यक्त करतात.

त्यांच्या प्रेमकवितांचा सर्वात लक्षणीय विशेष आहे सहजता. स्वाभाविकता. ना.घ. जगण्यावर प्रेम करणारे कवी आहेत. ‘मला जगायचे आहे’ असे आग्रहाने सांगणारे कवी आहेत. आणि त्यांच्या जगण्याविषयीच्या ओढीचे, उत्कटतेचे एक मोठे कारण आहे प्रेम. सृष्टीच्या विलसितांमध्ये त्यांचा जीव गुंतला आहे आणि प्रेयसीच्या स्पर्शामध्येही तो गुंतून राहिला आहे.

*कोरड्या या भूमीवर*
*श्रावणाच्या सरीखाली*
*उगवले तृणांकुर*
*इथे तिथे भवताली :*
*मला जगायचे आहे.*

असे तो म्हणतो आणि असेही म्हणतो की,

*ओलसर पदराचा*
*स्पर्श मनोहर धुंद*
*दाट काळा कचबंध*
*देतो मुग्ध मंद गंध :*
*मला जगायचे आहे.*

कविता त्यांना दिसली आहे तीच मुळी स्त्रीरूपात. तिची गूढकथाच त्यांच्या पापण्यांत न संपता सरलेली आहे आणि ती त्यांना जाणवली आहे आभाळातून चांदण्यांचे गीत गात जाताना, अंधारात कुजबुजत्या सागरलाटांमधून बोलताना! वाकल्या फांद्यांखालून जाताना, प्राजक्ताच्या फुलण्यातून सुगंधी श्वास घेताना! भरल्या ढगातून कधी तिचे पाऊल उमटते आणि कधी वाऱ्यामधून तिची पुसटशी चाहूल येते.

*नभगोलातून जाते कुणीतरी*
*गीत चांदण्यांचे गात*
*वर कुठे तरी किंचित हालला*
*तिच्या पदराचा काठ......*
*मूक शब्दशून्य तिची मनोव्यथा*
*धुक्यावर भरलेली*
*माझ्या पापण्यात तिची गूढकथा*
*न संपता सरलेली.*

सृष्टी आणि स्त्री या दोहोंच्या सहज परस्परांमध्ये विरघळून जाण्यात ना.घं.च्या कवितेला अस्तित्व मिळते आणि नैसर्गिक, मुक्त प्रेम हा तिचा ध्यास बनतो. ना.घं.ची मूळ प्रेरणा 'सहज' जगण्याची आहे आणि या प्रेरणेला प्रमाण मानून, तिच्याच प्रकाशात ते कविता लिहीत गेले आहेत. म्हणून तर त्यांची कविता कृत्रिमतेपासून पूर्णपणे दूर आहे. रविकिरण मंडळाच्या प्रभावकाळात ती लिहिली गेली असूनही तिचे अकृत्रिम, अव्याज रूप ना.घं.ना जपता आले ते केवळ त्यांच्या स्वाभाविक जीवनेच्छेमुळे.

त्यांच्या लेखी प्रेमभावना गैर नाही. शारीर मीलनही अनुचित नाही. जे जे नैसर्गिक आहे ते ते सहजपणे स्वीकारणारी ही कविता आहे. म्हणूनच की काय ना.घं.च्या कवितेतले प्रेम खुलून बहराला येते ते शेताशिवारांमध्ये. रानावनामध्ये. पण ना.घं.चे हे रान आणि शेतशिवार स्वायत्त नाही. मनुष्यजीवनाशी म्हणजेच पर्यायाने समाजाशी, संस्कृतीशी ते जोडलेले आहे. त्यांचाच एक भाग आहे, एक अंश आहे. आणि अर्थात तिथले प्रेमिकही जगाला ठोकरून प्रेमाचीच फक्त सत्ता मानणारे जीव नाहीत. ग्रामसंस्कृतीचे सगळे पारंपरिक संकेत ना.घं.नी स्वीकारले आहेत. या संस्कृतीच्या सगळ्या रूढी-प्रथा-श्रद्धा-समजुती आणि मूल्यव्यवस्था त्यांना मान्य आहेत. त्यांचा नायक प्रेयसीला आसपास कुणी नसताना धीटपणे भेटेल, पण घराजवळ भेटायचे तर उघडपणे नव्हे. आई-बहिणी झोपल्या आहेत असे पाहून, मागच्या दाराने. आणि त्यांच्या प्रेयसीला प्रियकराच्या उत्कट हाकेला प्रतिसाद द्यावासा वाटला तरी 'कशी त्यजू जनरीत तरी?' असाच व्याकुळ प्रश्न ती विचारत राहील. सामाजिक प्रतिष्ठेचा आणि घराण्याचा, कुळशीळाचा विचार ना.घं.च्या प्रेमिकांच्या मनातून सहसा दूर होत नाही.

ना.घं.ची प्रेमकविता धीट आहे असे म्हटले गेले आहे ते एका विशिष्टच अर्थाने खरे आहे. प्रेमाचा उच्चार नि:संकोचपणे करणारा आणि शारीर प्रणयाविषयी मोकळेपणाने बोलणारा नायक त्यांच्या पूर्वकालीन कवींनी रंगवला नव्हता. प्रेमाची चतुर, खुमासदार अभिव्यक्ती निरभ्रपणे कुणी केली नव्हती आणि प्रेमाची उन्मादकारी मोहिनीही त्यांच्याप्रमाणे कुणी शब्दांत आणली नव्हती. नायकांच्या बाबतीतही न घडणारे हे सारे ना.घं.नी नायिकांच्या बाबतीतही घडवले हे तर आणखी नवल होते. हातातल्या चुड्याचा आवाज होऊ नये म्हणून ते घट्ट बांधून, काळ्या निनावी भीतीला मागे सारत त्यांची नायिका अंधाऱ्या रात्री ओसाड पडक्या गढीकडे प्रियकराला भेटायला जाते. 'तुझ्यासाठी मी वेडीपिशी झाले आहे' अशी कबुली देते, स्पर्शसुखाने थरकत प्रियकराकडे पाहण्याची भाषा करते. ओल्या हिरवळीवर कुजबुजता संवाद करत तिमिराची खोली मोजण्याचा आग्रह करते.

मराठी कवितेत अशी नायिका हवी होती. अशी धिटाई नवी होती. या कवितेतली धिटाई अशी मनाला सुखावणाऱ्या प्रेमाच्या थेट उच्चाराची आहे. लावणीच्या जातकुळीत शोभावी अशी तिची मनमोकळी अभिव्यक्ती आहे.

मात्र, जगाची रीतभात झुगारण्याची धिटाई ती क्वचितच दाखवते. तशी रीतभात झुगारल्यानंतर जे वास्तव सामोरे येते त्याला स्वीकारणे सोपे नव्हे. धिटाईचे परिणाम फार खोल, गंभीर आणि गुंतागुंतीचे असू शकतात. त्या परिणामांचा विचार या नायक-नायिकांच्या मनात येत नाही आणि अर्थात त्या परिणामांना सामोरे जाण्याचे, ताणतणावांनी भरलेले, जीवनाच्या गुंत्यात अधिक खोल उतरून घेतलेले व्यामिश्र अनुभवही प्रेमकवितेत नाहीत.

ना.घं.च्या प्रेमकवितेचे सामर्थ्य आहे ते प्रेमाची एक स्वप्नतरल, धुंद भावावस्था प्रकट करण्याचे. त्या बाबतीत ते जीवनाच्या अगदी निकट गेले आहेत आणि म्हणूनच कमालीचे मार्मिक, सहज आणि मुक्त लिहून गेले आहेत.

ना.घं.च्या या कवितांमधला आशय ज्या प्रतिमांमधून व्यक्त होतो त्या प्रतिमा सगळ्याच कवितांमधून उत्कटपणे आणि सुसंगतपणे येतात असे नाही. कित्येकदा तर त्यांमधली विसंगती फार ढोबळ दिसते आणि कित्येकदा त्यातली गद्यप्रायताही निरर्थकतेची जाणीव करून देत राहते. पण जे बोरकरांच्या कवितांबाबत घडते, तेच ना.घं.च्या कवितांबाबत घडते. विलक्षण नादमधुरता, लयबद्धता आणि प्रतिमांमागची उत्स्फूर्तता यांचा एकत्रित परिणाम रसिकाला मंत्रमुग्ध करणारा ठरतो. ग्रामीण आणि 'संस्कृत' अशा दोन्ही प्रकारच्या शब्दांची सरमिसळ योजना करण्यातले अनौचित्यही मग सहजच दृष्टिआड होऊन जाते आणि प्रेमभावनेच्या नाजुक, तरल छटांचे नर्तन तेवढे स्मरणात उरते.

आयुष्याच्या उत्तरार्धात ना.घं.नी लिहिलेल्या कवितांचे स्वरूप थोडे वेगळे आहे. प्रेमामधली उन्मादकता कमी झाली आहे आणि उन्मदपणाची जागा विरहव्याकुळतेने घेतली

आहे. आयुष्याच्या उतरणीवरच्या प्रेमिकाचे गतस्मृतींमध्ये रमणारे मन, पूर्वीची जीवनाला आलेली मधुरता आठवून हुरहुरते आहे. थोडे उदास आहे. थोडे अस्वस्थ आणि हताशही आहे. वृद्धाच्या वासनेच्या सूक्ष्म छटांचे दर्शन मराठी कवितेत ना.घं.नीच प्रथम घडवले असावे असे वाटते. मरणाच्या छायेतली जगण्याची असोशीही त्यांनी फार सूक्ष्मपणाने व्यक्त केली आहे.

आणि तरीही ना.घं.ची कविता ही विकसत गेलेली कविता नाही. जीवनविषयक समजुतीची तिची जी व्याप्ती आणि खोली आहे ती प्रथमपासून जशी होती तशीच आहे. वयानुसार एखादा आधीचा तरुण माणूस पुढे प्रौढ होतो, वृद्ध होतो; तेव्हा त्याच्यात वयोमानाने जे फरक होतात तेवढेच फरक या कवितेच्या प्रवृत्तीत झाले आहेत. ते फरक मूल्यधारणांमधले नाहीत, निष्ठांमधले नाहीत, जीवनदृष्टीमधले नाहीत. काव्यदृष्टीमधले नाहीत आणि वास्तवाच्या आकलना-मधलेही नाहीत.

व्यक्ती आणि समाज यांच्या नात्याविषयीच्या, व्यक्ती आणि त्याचा परिवार यांच्या नात्याविषयीच्या, व्यक्ती आणि धर्म, राजकारण, संस्कृती यांविषयीच्या ना.घं.च्या धारणा फारशा स्पष्ट नाहीत आणि ज्या आहेत त्या बहुतांश पारंपरिक, सांकेतिक अशाच आहेत. काही कवितांमधून त्या मिथकांचाही आधार घेत प्रकट झाल्या आहेत, पण त्या मिथकांना नव्याने अर्थपूर्ण करण्यासाठी ना.घं.ची धडपड नाही. त्यांच्या धारणांचे प्रकटीकरण करण्याचे साधन म्हणून ती मिथके येतात. मात्र त्यांचे या कवितेतले अवतरण प्रभावी नाही, लक्षणीय नाही आणि अर्थविस्ताराची फारशी क्षमता असणारेही नाही.

ना.घं.चे सामर्थ्य आहे ते त्यांच्या प्रेमजाणिवेच्या रसपूर्ण, सूक्ष्मतरल अशा आविष्कारात. भावाची सगळी संपन्नता सांभाळणाऱ्या शब्दयोजनेत, प्रतिमायोजनेत आणि अनवट अशा वजनांच्या स्वैर, सहज उपयोजनेत. विलक्षण सघन अशी वातावरण निर्मिती आणि नादसंपृक्तता ही या कवितांची बलस्थानेच आहेत. 'अजून', 'कदाचित', 'पिसाट मन' यांसारख्या कितीतरी कवितांची साक्ष यासाठी देता येईल. व्यक्तिवादाचे सगळे सामर्थ्य आणि सौंदर्य अशा त्यांच्या कवितांमधून प्रत्ययाला येते यात शंका नाही.

**भावकवितेच्या महत्त्वाच्या टप्प्यावर**

ना.घं.ची कविता मराठी भावकवितेच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावरची कविता आहे. १९२० साली भा.रा. तांब्यांचा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांची गीते कमालीची लोकप्रियही झाली. मुख्य कल्पना मांडणारे ध्रुपद आणि ध्रुपदातल्या कल्पनेचा विस्तार करणारी नंतरची कडवी अशा स्वरूपाची ही गीतरचना श्रोत्यांना मनापासून आवडली. गाण्याचे अंग प्रभावी असणारी ती रचना होती. प्रत्येक रचनेच्या शीर्षभागी रागांची किंवा वृत्तछंदांची नोंद होती. अर्थातच गीताचे संगीताशी नाते अगदी स्पष्ट आणि घट्ट होते.

एका बाजूला रागदारी संगीताशी बांधलेली, तांब्यांसारख्या राजकवीची दरबारी विलासाचे गडद-फिके रंग मिरवणारी कविता तर दुसरीकडे रविकिरण मंडळाची चालीची ऐट मिरवणारी आणि गायनानेच लोकप्रिय झालेली कविता. अशा कवींचे रसिकमनावर अधिराज्य असताना 'शीळ' आणि 'नदीकिनारी' यांसारख्या ना.घं.च्या कवितांनी रसिकांना कवितेच्या गीतप्रकृतीचे नवेच भान घडवले.

ना.घं.ची प्रारंभीची रचना बहुतेक छंदोबद्ध आहे. रचनेचे काही घाट तर त्यांनी इतके अनवट वापरले आहेत की ते त्यांना कुठे मिळाले हा प्रश्न पडतो. 'रानारानात गेली बाई शीळ' किंवा 'जलधारांत, तारा छेडीत आला श्रावण छंदीफंदी' किंवा 'पक्षी वेळून मान, घेतील तान, गगनगमनाची' यांसारख्या त्यांच्या कवितांचे रचनाबंध त्यांना स्वत:ला स्फुरले की त्यांनी ते कुठे ऐकले आणि आपलेसे केले? भावपोषक अशा प्रकारचे लयपूर्ण रचनाबंध हा ना.घं.च्या रचनेचा विशेष आहे.


ना.घं.नी त्या रचनाबंधाच्या लयकारीची कुरघोडी कवितेच्या आशयावर कधी होऊ दिली नाही. अगदी विपुल असा मुक्तछंद लिहिला नाही. त्यांनी लयीचा हात कधी सोडला नाही, पण लयीच्या नादात भावकवितेचा प्राण असणारा आशय कधी संकोचू दिला नाही. त्यामुळे अवयवांमधून तरुणपण स्वाभाविकपणे प्रकट करणाऱ्या एखाद्या मुलीप्रमाणे त्यांची कविता रचनेच्या लयबद्धतेतून आशयाची समृद्धी स्वाभाविकपणे प्रकट करत राहिली.

कविता आणि गीत यांचे एकजीव रसायन ना.घं.च्या रचनेत सहजच झालेले दिसते. भावकवितेच्या विकासातला ना.घ. हा एक प्रमुख टप्पा म्हणायचा तो याच कारणाने. ना.घं.नी कवितेचे कवितापण अबाधित राखून तिला गीतगुणांचे स्वाभाविक लावण्य दिले.

स्वाभाविकता हा ना.घं.च्या आशय-अभिव्यक्तीचा मोठाच विशेष होता. अतिशय नैसर्गिक अशा स्वरूपातल्या अनुभवाला रूप देताना तशाच अगदी अकृत्रिम, उत्स्फूर्त अशा अभिव्यक्तीपद्धतीचा ना.घं.नी केलेला अंगिकार ही फार मौलिक अशी गोष्ट म्हटली पाहिजे. त्याने क्वचित विस्कळीत प्रतिमांचा, सरमिसळ भाषेचा किंवा गद्यप्रायतेचा दोष त्यांच्या कवितेच्या पदरी घातला असेलही पण त्याकडे दुर्लक्ष करावे इतक्या उत्स्फूर्तपणे आणि सौंदर्यपूर्ण रीतीने त्यांनी गीतगुणी कवितेचा आब राखला. भावकवितेचा आंतरिक विकास साधतच त्यांनी कवितेची गीतात्मता प्रकट केली.

मुळात ना.घं.ची कविता फार साधी आणि सहज आहे. तिचा कसला आग्रह नाही की अट्टहास नाही. आव नाही की महत्त्वाकांक्षा नाही. या कवितेला समाज बदलायचा नाही, तत्त्वचिंतन करायचे नाही, जीवनशोध घ्यायचा नाही की स्वत:ला खणून पाहायचे नाही. प्रेम आणि प्रेमाला बिलगून असलेली जीवनाची अभिलाषा यांचा सुखदु:खमय अनुभव व्यक्त करण्याची धुंदी या कवीला आहे आणि त्या धुंदीत मनभरून नैसर्गिक गाणे एवढेच तिला करावेसे वाटते आहे.

## हार्दिक अभिनंदन!



कुमार केतकर

'ग्रंथाली' वाचक चळवळीचे संस्थापक-सदस्य, कुमार केतकर यांना महाराष्ट्र शासनाचा 'लोकमान्य टिळक पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. त्याबद्दल 'ग्रंथाली' परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

गेली चाळीस वर्षे त्यांनी इकॉनॉमिक टाइम्स, संडे ऑब्झव्हर, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत व लोकसत्ता या दैनिकांत पत्रकार ते संपादक म्हणून लक्षणीय कामगिरी केली आहे. साहित्यिक, व्याख्याता, उत्तम वक्ता व विविध चळवळींशी त्यांचे नाते असे त्यांचे चौफेर व्यक्तिमत्त्व आपणास परिचित आहे.

समारंभमुक्त सत्कार असे या पुरस्कारवितरण कार्यक्रमाचे स्वरूप असावे अशी इच्छा कुमार केतकर यांनी व्यक्त केली होती. त्याप्रमाणेच एका आटोपशीर कार्यक्रमात हा पुरस्कार केतकर यांना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला.




**बाईच्या कविता**

किरण येले

दिलीप कुमारचा 'देवदास'जेव्हा जेव्हा पाहायचो
त्यातला देवदास, चंद्रमुखी नावाच्या वेश्येला
''तुम जैसी औरतें सहनशीलता की मूरत होती है.''
म्हणताना मी हमसून रडायचो का, ते आता कळतंय...

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**


या सहजपणाने, नैसर्गिकतेने ना.घं.च्या कवितेला मिळालेल्या यशाचा मोठा वाटा उचलला आहे. 'नदीकिनारी, नदीकिनारी' किंवा 'रानारानात गेली बाई शीळ' यांसारख्या त्यांच्या कवितांनी ग्रामोफोनच्या तबकड्यांचे अधिराज्य असणारा काळ गाजवला हे खरे, पण तो काळ मागे पडला आणि त्या काळात जन्माला आलेली कितीएक कृत्रिम, बेगडी ग्रामीण ढंगाची गाणी विस्मरणात गेली, तरी मराठी भावकवितेच्या विकासाची वाटचाल निरखताना ना.घं.ची कविता एका महत्त्वाच्या टप्प्यावर उरलीच. ज्या ग्रामसंस्कृतीत ती बहरली होती ती ग्रामसंस्कृती आता राहिली नाही. ज्या काळात तिला रसिकांनी माथ्यावर मिरवले होते तो काळ आता राहिला नाही. प्रेमजाणिवेचा आणखी कितीतरी व्यामिश्र आणि प्रगल्भ उच्चार करणारी कविता पुढच्या काळातल्या प्रतिभावंत कवींनी लिहून ठेवली. तरीही, ना.घं.नी कवितेची केलेली एकाग्र साधना, प्रेमाच्या उत्स्फूर्त, स्वाभाविक जाणिवेचे त्यांनी निरखलेले विविध पैलू, त्यांच्या प्रेमजाणिवेला बिलगलेली जीवनाची अभिलाषा आणि वाढत्या वयात त्या प्रेमाचे आणि त्या अभिलाषेचे फिकटणारे, उदास करणारे रूप यांची आठवण रसिकमनात अमिटपणे राहीलच. 'खूणगाठी' नावाच्या त्यांच्या संग्रहात एक सुरेख कविता आहे - 'अजून माझ्या तळहातावर.' त्या कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत-

*भवताली थरकते मुकेपण;*
*फुलेंच गेली तरीहि ये पण :*
*अजून माझ्या तळहातावर*
*सुगंध उरले, सुगंध उरले*

ना.घं.च्या कवितेबाबतही आपला असाच अनुभव असतो आणि असेल.


**अरुणा ढेरे**
'विदिशा' ३२/बी,
तुळशीबागवाले कॉलनी,
पुणे - ४११००९
फोन : (०२०) २४२२०२८०

# ‘प्रत्ययपर्व’विषयी...

## डॉ. राजन गवस

मनोहर जाधव यांच्या ‘प्रत्ययपर्व’ संग्रहातील कविता जेव्हा माझ्या हातात आल्या तेव्हा त्यांच्या ‘पारिजात’ या नियतकालिकातील कवितांची आठवण आली. ऐंशीच्या दरम्यान त्यांच्या कविता मी वाचलेल्या होत्या. त्यानंतरच्या काळात त्यांच्या कवितांचा संग्रह येईल असे वाटले होते. पण त्यांनी संग्रह प्रसिद्ध केला नाही. मध्ये मध्ये त्यांची एखादी कविता वाचावयास मिळायची. त्यांची कवितेशी संगत सुटलेली नाही याची साक्ष ती कविता द्यायची. आज त्यांच्या कविता संग्रहाच्या स्वरूपात वाचकांसमोर येत आहेत. ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे.

या कविता एकत्रित वाचत असताना जाधव यांचे शांत, संयत व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येते. जगण्याच्या धकाधकीत ते आपल्या आतला आवाज प्रदूषित न होऊ देता जपून ठेवतात. त्यामुळे ते भोवतालाला समंजस प्रतिक्रिया देऊ शकतात. ही प्रतिक्रिया त्यांच्या चिंतनशीलतेने भारित झालेली, टोकदार स्वरूपाची असते. होणाऱ्या बदलाला ते फक्त बदल म्हणून पाहत नाहीत तर त्यामागचे समाजमानस खणून प्रक्रियेच्या मुळाकडे जाणे पसंत करतात. परिणामी, त्यांची कविता दर्शनी साधी-सरळ आणि सोपी वाटत असली तरी ती आशयगर्भ आणि धारदार बनत जाते.

जाधव यांच्या कवितांची आशयसूत्रे विविधांगी आहेत. शोषणाला विरोध करणाऱ्या त्यांच्या कवितेत परंपरागत अन्यायाच्या विरोधात बंड पुकारणारी भाषा कृतिशीलतेकडे वळते. अनेक कवितांमधून ही क्रांतीची आशयसुत्रे भक्कमपणे काव्यरूप घेतात. परंपरेने नाकारलेले माणूसपण, अनन्वित केलेला छळ, यातूनही नव्या उजेडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने दाखविलेली सम्यक् क्रांतीची नवी वाट तुडवत आजची उभी राहिलेली नवी पिढी, तिची आकांक्षा, त्यांच्या भोवतालचे वर्तमान जाधव यांच्या कवितेचे विषय होतात. ‘अगदी सुरुवातीला’, ‘आम्ही आता’, ‘मी क्षणाक्षणाने’ ‘चुगलखोर’, ‘संघर्ष’, ‘प्रवाहाच्या विरुद्ध’, ‘एका वळणदार’ यांसारख्या कविता माणूसपणाच्या लढाईतील विविध अनुभवांना शब्दबद्ध करतात.

> माया पांघरणाऱ्या आभाळानं
> नि ओलावा देणाऱ्या मातीनं सपशेल
> नाकारलं
> प्रेमाचे निरोप आणणाऱ्या वाऱ्यानंही
> लाच खाल्ली
> रस्त्यांनी ठिगळं लावून तोंडं फिरवली
> दिशांनी उघड छिनाली हैदोस मांडला
> इथले सारेच कसाई निघाले

या ‘आम्ही आता...’ या कवितेतील ओळी परंपरेने जगणे नाकारलेल्या समूहाच्या मनातील उद्रेक शब्दबद्ध करणाऱ्या आहेत. पिढ्यान् पिढ्या अन्याय सहन करणाऱ्या समूहाच्या मनातील हा उद्रेक जेव्हा बंड करून उठतो तेव्हा त्यांचे क्रांतीप्रवण घोडे बेलगाम होतात. आणि हे समूह बोलू लागतात-

> तेव्हा बोललो नाही
> आता तेवढी सवड नाही
> आम्ही इमान सोडीत आहोत!
> आम्ही हातात आभाळ पेलीत
> आहोत!!
> आम्ही वादळाची गाणी गात आहोत!!!
> आम्ही आता नंगे होत आहोत...!

हे पेटलेपण या कवितांचा गाभा आहे. कधीकाळी अन्यायग्रस्त असणारे हे समूह आता उजेडाच्या बेटाकडे प्रवास करताहेत. हा प्रवास खाचखळग्यानी भरलेला, काळजावर कडवट संदर्भ घेऊन वादळांना हाका देणारा आहे. पीडित, शोषित समूहाने आंबेडकरी तत्त्वज्ञानातून ऊर्जा घेऊन नवे जग निर्माण करण्याचा प्रवास सुरू केला. पण हा प्रवासही जखमांनी भरलेलाच आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समतेचे वारे वाहू लागले, पीडित समूहाला नव्या जगाची स्वप्ने पडू लागली हे खरे असले तरी व्यवस्थेचा जाच संपला असे झाले नाही. व्यवस्थासमर्थकांच्या जाचाने नवे स्वरूप धारण केले. हा जाच व्यक्त करताना कवी लिहितो,

> मी दिसल्यावर लोक दचकतात,
> पाहतात आश्चर्याने
> काही आंबट हसतात
> थोडा पुढे गेल्यावर कुत्सितपणे
> कुजबुजतात आपापसांत.

ही कुजबुज जीवघेणी, घायाळ करणारी आणि माझ्या कपाळावर माझी जात लिहिली का, असा प्रश्न उपस्थित करणारी. या अनुभवाने जखमी झालेला माणूस पिसाट होणे स्वाभाविकच. म्हणून पुढे कवी लिहितो-

> माझी जखम-
> ठसठसता पहाड-आभाळ-समुद्र
> माझ्या मस्तकात ज्वालामुखी
> अव्याहत खदखदत असतो,
> नि वादळ प्याल्यासारखा
> मी क्षणाक्षणाने पिसाटत जातो...

हे क्षणाक्षणाने पिसाटत जाणे, उसवत जाणे, आतील धग उफाळून बाहेर येणे

यातूनच व्यवस्थेला उलथवण्याचा कृतिशील आवाज बुलंद रूप धारण करतो,

मी सावधपणे बाह्या वर सारल्या
वाकून दगड हातात घेतला-
आणि वर्तुळाला घाम फुटला

हे वर्तुळ तुटत नाही फक्त घामाळते हे जास्त वेदनादायक आहे. वर्तुळ तोडून नवा समाज निर्मितीचे कवीचे स्वप्न आपल्याला या कवितेतून ठायी ठायी दिसते. जाधव यांच्या या कवितांनी आजच्या वर्तमानाला थेट प्रतिक्रिया दिली आहे. ही प्रतिक्रिया वाचकाला विचारप्रवण करते.

जाधव यांच्या काही कविता या पीडित, शोषीत माणसांच्या जगण्यातील ताणतणावांना शब्दबद्ध करतात. 'बक्कल नं. तीनशे त्रेचाळीस', 'पराभूत', 'रातराणी', 'रावसाहेब' यांसारख्या कविता अशा माणसांच्या कविता आहेत. इमानदारीनं ड्युटी करणारा पोलीस आपल्या एकुलत्या एका पोरीच्या वाढदिवसाला तिच्या मनासारखी पँटही आणू शकत नाही. मात्र त्याचे साथीसोबती चिरीमिरीची माया जमवून ऐश करत राहतात, तरीही इमान न सोडणारा बक्कल नं. तीनशे त्रेचाळीस आपल्या हिरमुसल्या मुलीने बापाचीच खाकी पँट घालून कडक सॅल्युट मारल्यावर लख्खकन उजळतो आणि भविष्याविषयी आशावादी होतो. नव्या जगात आपल्या मुलीलाही जगायला जागा असेल अशा आशेवर आपले इमान सांभाळत राहतो. जाधव यांचे शब्दचित्र रेखाटण्याचे कौशल्य या कवितेतून आपल्यासमोर येते. शब्दांचा मितव्यय आणि अंगभूत लय यातून त्यांनी रेखाटलेले शब्दचित्र अधिक सखोल होत जाते.

जाधवांच्या काही कवितांची आशयसूत्रे ही सखीच्या शोधाने व्यापली आहेत. परंतु ह्या पारंपरिक प्रेमकविता नाहीत. या कविता नव्या जगण्याच्या, नव्या शोधाच्या कविता आहेत.

अगं, इतकं अगतिक होणंही ठीक
नाही
माझ्या भन्नाट जगण्याशी
आपलं नातं जोडण्याआधी
तू तपासून घे स्वतःला

यासारखा सावधतेचा सल्ला जसा त्यांच्या कवितेत येतो, तसेच


एकल्या गलबतानं
अपरिहार्यपणे बुडत जावं सावकाश
स्वतःच्याही नकळत
अथांग समुद्रात
अशी मरणं रोज जगणारा मी

अशी स्वतःच्या जगण्याची चिरफाडही या कवितांतून जागोजाग भेटते.

त्यांच्या प्रेमभावाला वास्तवाचे भक्कम पाठबळ आहे. जाधव 'मी', 'तू' या संकल्पना वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या कवितांतून फिरवतात. त्यामधून ते सामाजिक संकेत, अन्यायाचा इतिहास, माणुसकी नाकारणारा छळ या साऱ्याला जोडून घेतात.

महानगरात जगत असताना येणारे ताण, होणारी घुसमट या साऱ्याला या कवितेत अवसर मिळतो. महानगरीय जगण्यातील ताणतणाव, चेहरा हरवलेले एकाकीपण, जगण्याची दमछाक करणारी लढाई आणि यातून संवेदनेवरच होणारा हल्ला या कवितांमधून अत्यंत तीव्रपणे व्यक्त झाला आहे. जाधव यांची कविता विविधांगी आशयसूत्रांमुळे सहज स्वाभाविकपणे व्यामिश्र होत जाते. या कवितेत पक्षी, झाडे, समुद्र, रस्ते इत्यादी सर्व संदर्भ येतात. पण त्या साऱ्याला जगण्यातील तुटलेपणाचा, नाकारलेपणाचा संदर्भ जोडला जातो आणि या प्रतिमा नवा आशय प्रसवण्यास साहाय्यकारक होतात. जाधवांच्या कवितांमधून नवनव्या आविष्कार- तंत्रांचा वापर केल्याचे आपल्याला प्रत्ययास येते. या कविता मुक्तछंदातून लिहिल्या गेल्या असल्या तरी त्यातील आंतरिक लय आशयाला बहुस्तरीय करीत जाते.

जाधव यांचा दीर्घ प्रतिक्षेनंतरचा हा संग्रह वाचकांना नवे प्रत्ययपर्वच आहे. मराठी वाचक या प्रत्ययपर्वाचे-कवितेचे-मनःपूर्वक स्वागत करतील अशी मला निश्चित खात्री वाटते.


## प्रत्ययपर्व

मनोहर जाधव

**मूल्य ७० रुपये**
**सवलतीत ४० रुपये**

सामान्य माणसाला शोधणे, सामान्य माणसातील सृजनात्म भेटणे हेच कलासाहित्याचे उद्दिष्ट आहे, असे कविवर्य नारायण सुर्वे म्हणतात.मनोहर जाधव व त्यांची कविता योग्य वाटेवर आहे असे वाटते, ते या अर्थाने!
या कवीचे वास्तवाचे, मूर्ताचे, अवतीभवतीच्या घटितांचे संवेदन जागृत आहे.
मनोहर जाधवांची कविता अशाच संवेदनांतून प्रस्थान ठेवते.
**- प्रा. रा.ग. जाधव**

# हत्या

## नक्षलवादी प्रश्नावर उभी राकेश भडंगची नवी कादंबरी

**दिनकर गांगल**

राकेश भडंगची 'हत्या' नावाची कादंबरी आणि 'सैतानाची खुशी' या नावाचा कवितासंग्रह ठाणे येथील साहित्यसंमेलनात प्रकाशित झाले. राकेश भडंग हा वेगळ्या धाटणीचा, संवेदनशील परंतु, आपला कथाविषय थेट लिहिणारा असा लेखक आहे. तो इंग्रजी आणि मराठी अशा दोन्ही भाषा सहजतेने लिहू शकतो. त्याचा व्यवसाय संगणकाशी संबंधित असा सॉफ्टवेअरचा आहे. तो अमेरिकेत असतो. त्याने तेथे आपल्या व्यवसायाचा जम बसवला आहे. त्याचबरोबर तो लेखनही ओढीने करत असतो.

राकेश भडंगने बारा-पंधरा वर्षांपूर्वी माझ्याकडे काही कथा पाठवल्या होत्या. त्यांपैकी दोन-तीन आम्ही 'रुची'मध्ये प्रकाशितही केल्या. त्या कथांमधील भावविचारविश्व वेगळे व आधुनिक होते आणि ते मांडण्याची हातोटी अलिप्त होती. मला त्या लेखनाचे बीज परकीय असावे असे वाटले. मी राकेशला तसे पत्र लिहिले आणि म्हटले, की तुमच्या कथा प्रकाशित होतील. फक्त त्याखाली 'आधारित' असे लिहावे लागेल. त्याचे उत्तर, 'कथा माझ्या मी लिहिलेल्या आहेत व त्या स्वतंत्र आहेत' असे आले. त्या कथा प्रसिद्ध झाल्या. त्यांचे यथायोग्य स्वागत झाले.

राकेश भडंग त्यानंतर गायब झाला. 'ग्रंथाली'च्या बहुमाध्यम यात्रेत, नाशिकला त्याच्या मित्राकडे विषय निघाला. त्याच्याकडून समजले की राकेश अमेरिकेत असतो! दोन वर्षांपूर्वी, अचानक राकेश माझ्या घरी आला. त्याच्या हातात लेखनाचे भलेमोठे बाड होते. मी त्याला पाहत प्रथमच होतो. तो अमेरिकेत सॉफ्टवेअर व्यवसायात आहे. त्याने तिथे इंग्रजी कथा-कादंबऱ्या लिहिणे सुरू ठेवले होते. तो हौशी लेखक वर्तुळात वावरू लागला; मुख्यत: कवितांचे वाचन करू लागला. अशातूनच पाठपुरावा करत-करत त्याची पहिली कादंबरी सिद्ध झाली. ती इंग्रजीत आहे. त्याच्या मनात दुसरी कादंबरी होती. त्याने त्या कादंबरीची कथावस्तू सांगितली आणि पहिल्या कादंबरीचे टंकलिखित माझ्या हाती देऊन तो निघून गेला. मला त्याच्या दुसऱ्या कादंबरीच्या कथावस्तूने अधिक मोह घातला होता. परंतु बघता बघता, गेल्या दोन वर्षांत त्याच्या पहिल्या कादंबरीचा विषय- नक्षलवादाचा उदय व प्रभाव- प्रासंगिक महत्त्वाचा ठरला. मी त्याला सुचवले, की आता ही कादंबरी मराठीत प्रसिद्ध झाली तर चांगली स्वीकारली जाईल! त्यानुसार कादंबरी मराठीत उतरली, संपादकीय संस्कार झाले. काही फेरबदल मुदलातच घडवून आणावे लागले आणि अशा तऱ्हेने, ही कादंबरी इंग्रजीआधी मराठीत प्रसिद्ध होत आहे.

मला या कादंबरीचे अनेक अंगांनी वैशिष्ट्य वाटते, एक तर ती फार झपाट्याने वाचली जाते. दुसरे म्हणजे लेखकाने ती पत्रकाराच्या दृष्टीतून लिहिलेली आहे, त्यामुळे कादंबरी वेधक झालेली आहे. शिवाय, त्यात सतत रोमहर्षक घटना घडत जातात आणि कादंबरी एखाद्या 'थ्रिलर'प्रमाणे वरकरणी वाटते. कादंबरीचा विषय नक्षलवादाचा उगम आणि नक्षलवाद्यांची कारस्थाने हा असला व त्यामुळे कादंबरी १९६९-७०च्या बंगालमध्ये घडत असली तरी तिचा पसारा स्वातंत्र्ययुद्धापासून सुरू होतो. स्वाभाविकच, कादंबरीला राजकीय तात्त्विक बैठक मिळते.

परंतु त्यातील खरा संघर्ष आहे तो कादंबरीचा नायक मानव याच्या मनातला. तो पत्रकार आहे. त्यामुळे सत्यशोधन हा त्याचा प्राण आहे. घटना अशा घडत जातात, की त्याच्या या जीवनव्रताला भावनात्मक आव्हान तयार होते, तो संभ्रमात पडतो आणि गळपटतो. त्यातून सावरायला मानवला मदत होते ती निसर्गाची. या अखेरच्या टप्प्यात कादंबरी रोमहर्षक होतेच, पण वाचकासमोर तत्त्वज्ञानात्मक प्रश्न उभे करू लागते.

राकेशने ही कादंबरी लिहिली आहे रंगतदारपणे. त्याचा कादंबरीचा नायक मानव याच्या जीवनात आठवडाभरात घडलेल्या घटना कादंबरीत उलगडतात. तथापि, मानवाच्या व अन्य पात्रांच्या आठवणी, वर्तमानपत्रातील कामाची पार्श्वभूमी आणि वेगवेगळ्या व्यक्तिरेखांचे अल्पशब्दांतील नेमके रेखाटन यामुळे कादंबरीला वाचनवेग प्राप्त झाला आहे. तरीही त्या लेखनातील गंमत अशी आहे की, लेखकाचा चिंतनशील स्वभाव त्यामधून शांतपणे प्रगट होत राहतो. विशेषत: मानव जंगलामध्ये नक्षलवाद्यांच्या सावटाखाली असतो तेव्हा मानव आणि निसर्ग यांमधील नाते तरल रीतीने आविष्कृत होते.

राकेश भडंगची पुढची कादंबरी कॅलिफोर्नियातील भारतीयांची हत्या करत सुटलेल्या एका माथेफिरू गोऱ्या अमेरिकनाची (स्नायपर) कथा सांगते. तो म्हणतो, की ही इंग्रजी कादंबरी पहिल्या कादंबरीच्या आधी प्रसिद्ध होईल.

अमेरिकेत राहून लेखन करू इच्छिणाऱ्या मंडळींचे एक वैशिष्ट्य या निमित्ताने मुद्दाम नोंदवावेसे वाटते. ते लेखन-व्यवहाराकडे व्यावसायिक दृष्टीने पाहतात. त्यासाठी प्रशिक्षण वगैरे घेतात. न्यू जर्सीचे डॉ. प्रकाश लोथे यांच्या मनात कादंबरी लिहिण्याचे आले तर त्यांनी कादंबरीलेखनाचा दोन वर्षांचा अर्धवेळ अभ्यासक्रम आधी पूर्ण केला. त्यातून त्यांना लाभलेली लेखनदृष्टी त्यांनी एका लेखात मांडली आहे. प्रशांत कऱ्हाडे हा तरुण सहा वर्षे अमेरिकेत राहून पुण्यात विसावला आहे. त्याने एक इंग्रजी कादंबरी लिहिली, आणि मग सॉफ्टवेअरमधील नोकरी सोडून पूर्णवेळ लेखक होण्याचा ध्यास घेतला, तेव्हा त्याच्या ध्यानी आले, की पुस्तके नुसती लिहून भागत नाही. ती छापून विकावी लागतात. त्यामुळे त्याने 'ॲमेझॉन डॉट कॉम'पासून सर्वांशी संपर्क साधत स्वत:ची 'ए.पी.के. पब्लिशर्स' नावाची कंपनी स्थापन केली आहे. तो यशस्वी प्रकाशनाचे वेगवेगळे प्रयोग करून पाहत आहे.

मराठी साहित्यामध्ये वाङ्मयीन व्यवहाराला अकारण नैतिकता, पावित्र्य दिले गेले आहे. चांगले पुस्तक वाचनात आले, की मन उन्नत, प्रगल्भ होते हे खरे. परंतु माणूस वाचतो तो मुख्यत: मन रिझवण्यासाठी. त्यामुळे त्याच्या लेखी चांगली कविता किंवा वाईट कविता किंवा तशीच कथा-कादंबरी असे मानदंड असतात. त्यामध्ये मनोवेधकता हा मोठा निकष असतो. हा निकष समीक्षा व्यवहारात किती महत्त्वाचा मानला जातो हे मला माहीत नाही. परंतु आम समाजापर्यंत साहित्य न्यायचे असेल तर लेखनात नवे जीवनदर्शन आणि वाचन-वेधकत हे प्रमुख घटक असणे गरजेचे आहे. ते राकेश भडंगच्या लेखनात जाणवतात. त्यामुळे भडंगच्या लेखनाकडेही मी अपेक्षेने पाहत आहे.

मराठीमध्ये गेल्या काही काळात वेगवेगळ्या व्यवसायांतील लेखक लिहू लागले आहेत. लोकप्रिय व उत्तम इंग्रजी साहित्य मराठीत येत आहे. त्यामुळे वेगवेगळ्या तऱ्हेचे जग प्रगट होत आहे. त्यांची लिहिण्याची पद्धत देखील थेट आहे. अशा लेखकांचा वाचकांशी सरळ सुसंवाद होऊ लागेल, ते समीक्षाव्यवहारातून निर्माण झालेल्या पंथबाजी वा कंपुशाहीमध्ये अडकणार नाहीत आणि पुन्हा एकदा खांडेकर-फडके काळातील समाजातील साहित्यप्रभावाचा प्रवाह खळाळत वाहू लागेल अशी आशा करुया.

**दिनकर गांगल**

ए/३, अजिंक्यतारा सोसायटी,
स्वस्तिक पार्क, सी.एस.टी.रोड,
चेंबूर, मुंबई ४०००७१.




**हत्या**

राकेश भडंग

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

राकेश भडंगची कविता विचारपरिप्लुत आहे; पण विचारजड नाही. तो साऱ्या जगाचे प्रश्न, भावभावना समजावून घेऊ शकतो आणि थेट मानवी अस्तित्वाच्या मुद्यालाच भिडतो. बिकट तत्त्वज्ञान वाटावे अशी ही गुंतागुंत तो कवितेच्या रेषांमधून सरळ मांडत जातो. त्यामध्ये प्रेमाची कविता आहे, हसण्याखेळण्याची कविता आहे, स्त्रीमुक्तीची कविता आहे, इसापाचीही कविता आहे... राकेश भडंगच्या कवितांचा हा पसारा वाचून त्याच्या आधुनिक दृष्टीचा प्रत्यय येईल आणि वाचकाची समजूत प्रगल्भ होईल...




**सैतानाची खुशी**

राकेश भडंग

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**

### वाहतूक ठप्प! – अशोक दातार

# मुंबईच्या ट्रॅफिक प्रश्नाचा उभा–आडवा छेद

मुंबईतून अडीच लाख गिरणी कामगारांचे उच्चाटन झाल्यावर या महानगरात 'ड्रायव्हर'चा नोकरीधंदा वधारला आहे. या शहरात चार लाखांहून अधिक ड्रायव्हर आहेत. त्यांच्यावर ड्रायव्हिंगचे बिकट काम 'आऊटसोर्स' करून गाडीमालक आणि शासकीय व महापालिका अधिकारी आपापल्या एसी गाड्यांमध्ये आपली कामे बिनघोर करत राहतात वा विश्रांती घेतात आणि म्हणूनच मुंबईत झालेला वाहतुकीचा खेळखंडोबा त्यांना त्रस्त करून सोडत नाही, असा आरोप वाहतूक अभ्यासक अशोक दातार यांनी केला आहे.

ते म्हणाले, की मोठमोठ्या अलिशान इमारती आणि कचेऱ्या व व्यवसाय येथे रस्त्यांवर वा पार्किंग लॉटमध्ये ड्रायव्हर मंडळी घोळक्या घोळक्यांनी उभी असतात आणि त्यांचे 'मालक' एअरकंडिशण्ड 'घर-कचेऱ्यां'मध्ये सुखाधीन असतात! पाच ते आठ तास रिकामी असलेली ही ड्रायव्हर मंडळी हा मोठा सामाजिक प्रश्न ठरू शकतो; पण त्याहून अधिक गंभीर राक्षसी समस्या निर्माण केली आहे ती खुद्द वेगवेगळ्या दिमाखदार ब्रँड्सच्या गाड्यांनी! त्यांचे वेळीच नियंत्रण केले गेले नाही तर मुंबईतल्या आठ लाख गाड्या या शहराला गिळून टाकतील. त्यांची संख्या रोज दोन ते तीनशेंनी वाढत आहे.

दातार यांच्या 'वाहतूक ठप्प! बसू नका गप्प' या पुस्तकाचे प्रकाशन एका अनौपचारिक समारंभात झाले त्यावेळी दातार यांनीच आपला मुलगा सलील दातार व सहकारी अभ्यासक राहुल दांडेकर यांच्या सहकार्याने पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन केले. दातार व त्यांचे सहकारी सोनाली केळकर, सुधीर व प्रशांत यांनी गेली बारा वर्षे मुंबईतील वाहतुकीची अभ्यास चालवला असून माहिती हक्काच्या आधारे अनेक तऱ्हेची माहिती संकलित केली आहे. ती या पुस्तकात ग्रथित आहे. दातार यांच्या अभ्यासगटाचे वैशिष्ट्य असे, की त्यांनी छोट्या छोट्या उपायांनी मुंबईतील वाहतूक कशी सुकर होऊ शकते हे दाखवून दिले आहे.

त्यांनी एक उदाहरण सचित्र सादर केले. ते म्हणाले, की वाकोला फ्लायओव्हरखालील दोन लेन्स वाहतुकीस खुल्या केल्या तर उजवे वळण घेऊ इच्छिणाऱ्या गाड्यांच्या संख्येत दर सिग्नलला, दर मिनिटाला वीसने वाढ होऊ शकते हे आम्ही दाखवून दिले व तो प्रयोग प्रत्यक्षात आला! पुढे त्यांनी जोड दिली, की हा प्रयोग वाहतूक अधिकाऱ्यांच्या गळी उतरवण्यास मात्र दोन वर्षे लागली आणि प्रयोग डाव्या वळणास राबवता आला नाही, कारण तेथे पुलाखाली पोलिस चौकी आहे. ती 'अधिकृत' आहे की 'बेकायदा' आहे याबद्दल नागरिकांच्या मनात शंका आहे.

अशोक दातार मुंबई या अगडबंब वाढत गेलेल्या शहरापुढील प्रश्नांनी व्यथित झाले आहेत. त्यांच्या आवाजातील आर्ततेने श्रोते भारावून गेले होते. अशोक दातार यांचे निवेदन साऱ्यांना अंतर्मुख करून गेले. दातार म्हणाले, की मुंबई ही धगधगत्या ज्वालामुखीएवढी भीषण समस्या आहे. मात्र ती अधिकाऱ्यांना व नागरिकांनाही जाणवत नाही आणि ते तिकडे डोळेझाक करतात. मुंबईचे प्रश्न सोडण्यास पैशांची गरज नाही. त्याबाबत जाणून घेण्याची व विचार करण्याची (माइंड स्पेस) गरज आहे. तेवढी उसंत मुख्यमंत्री, पोलिस आयुक्त व महापालिका आयुक्त यांनी काढावी. 'आदर्श' व 'राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा' यांच्यापेक्षा मोठे घोटाळे मुंबईत छुपले गेलेले त्यांच्या ध्यानी येतील!

दातार यांनी निदर्शनास आणून दिले, की मुंबईचे उच्चभ्रू नागरिक झोपड्या उभ्या राहिल्या की शिव्या देत असतात, परंतु झोपडीएवढीच जागा प्रत्येक गाडी रस्त्यावर फुकट व्यापत असते आणि गाडी हे मात्र प्रतिष्ठेचे लक्षण ठरते! दातार यांनी वाहतूक समस्या सोडवण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला –लोकल ट्रेन, बस, टॅक्सी, रिक्षा यांना– अग्रक्रम द्यावा आणि खाजगी गाड्यांवर पार्किंग फी, वार्षिक शुल्क असा बोजा लादावा या प्रकारचे वाहतूक धोरण त्यांच्या पुस्तकात सुचवले आहे. त्यांनी त्याचा पुनरुच्चार सादरीकरणात केला.

पुलाखालील जागांच्या वापरावर देखरेख व अंकुश असावा, तसेच किमान स्वच्छता व नीटनेटकेपणा राखला जावा असे मतही अशोक दातार यांच्या 'वाहतूक ठप्प: कारणे व उपाय' या पुस्तकामध्ये व्यक्त केले आहे.

अशोक दातार यांचे पुस्तक 'ग्रंथाली'तर्फे प्रकाशित झाले आहे. पुस्तकात मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेतील अनेक विसंगती नजरेस आणून दिल्या असून, त्या दूर करण्याचे उपाय सुचवले आहेत.

दातार व्यवसायाने अर्थव्यवहारतज्ञ असून त्यांनी गेल्या दहा वर्षांत जगातील अनेक नमुनेदार शहरांमधील वाहतूक व्यवस्थेचा मुंबईच्या संदर्भात अभ्यास केला आहे. त्यांनी खुद्द मुंबईमधील कोपरान् कोपरा धुंडाळला असून सहज अमलात आणता येतील अशा वाहतूक सुधारणेच्या गोष्टी सुचवल्या आहेत. त्यांनी वाहतूक कोंडी विशेष होते अशा जागांची, तेथून जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांची पाहणी केली आहे.


दातार महापालिकेच्या व महानगर प्राधिकरणाच्या काही समित्यांवर तज्ञ सभासद आहेत. तथापि या समित्यांच्या बैठका चहापानापुरत्या असतात व सूचना बासनात राहतात असा त्यांचा अनुभव आहे. म्हणून त्यांनी आपला गेल्या दहा वर्षांचा अभ्यास पुस्तकरूपाने जनतेसमोर खुला केला आहे.

त्यांचे मुख्य म्हणणे असे आहे, की वाहतूक व्यवहार हा अर्थव्यवहार आहे. तो स्वयंपूर्ण असला पाहिजे. त्यास सबसिडी देता कामा नये. त्यामुळे मुंबईत खासगी गाड्यांना वार्षिक शुल्क आकारावे, त्यांना पार्किंग फी लावावी. त्यातून मुंबईचे अनेक प्रकल्प उभे करता येतील. सार्वजनिक वाहतूक- बस, रेल्वे, टॅक्सी, रिक्षा-मात्र सोपी सहज, रास्त खर्चाची व आरामदायी असावी असे दातार यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

या पुस्तकाचे द्वितीय प्रकाशन 'ग्रंथाली' वाचकदिनी ठाणे येथे झाले.

**प्रतिनिधी**


## ग्रंथालीचे प्रकाशन




### *वाहतूक ठप्प बसू नका गप्प!*

### कारणे व उपाय

**अशोक दातार**

वाहतूक ठप्प.... हा आपला दररोजचा चीड आणणारा अनुभव. ५५ उड्डाणपूल बांधले गेले, वांद्रे-वरळी सागरी सेतू आता जुना झाला, ही उदंड झाले. मोटारींचा महापूर वाढतोच आहे आणि मुंबईकरांनी, वाहतूक सुरळीत होईल ही आशाच आता सोडून दिली आहे. मुंबईतच नव्हे तर इतर शहरात देखील वाहतूक कोंडीचा गळफास लोकांना जाणवू लागलाय. यावर काही कठोर, प्रामाणिक परंतु निश्चित आणि परिणामकारक असे उपाय या पुस्तकात सुचविले आहेत. हे पुस्तक आपल्याला, ''आहे हे असेच चालणार आणि परिस्थिती अधिकच बिकट होणार आहे. पर्यावरणाविषयी केवळ बोलायचे असते, त्यासाठी आपण करायचे काहीच नसते आणि शेवटी सरकार काय करणार आहे ते आपल्याला माहीतच आहे, कशाला वेळ घालवा'' या मनोवृत्तीतून बाहेर काढून असा आशावाद जागृत करेल ही अपेक्षा!

**मूल्य १२० रुपये । सवलतीत ७० रुपये**

# अंडरगर्डिंग

## सु.गो. तपस्वी

भारताने लोकशाही राज्यपद्धती निवडली आणि संविधान तयार करण्यासाठी घटनासमितीची स्थापना केली. गेल्या शतकात जगभरात अस्तित्वात आलेल्या लोकशाही राज्यपद्धतीचेसुद्धा अनेक प्रकार आहेत. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी भारतासाठी लोकशाही राज्यपद्धतीचे स्वरूप निश्चित करण्याकरिता बराच अभ्यास झाला होता, परंतु नेत्यांचा कल ब्रिटनमधील लोकशाही राज्यपद्धतीकडे झुकला. ब्रिटिश लोकशाही राज्यव्यवस्थेत व्यक्तिगत मत देऊन प्रत्यक्ष जनता प्रतिनिधी निवडते व निवडणुकीत विजयी ठरलेले हे लोकप्रतिनिधी पक्षीय संख्याबलानुसार संसद प्रस्थापित करून राज्यकारभार करतात. त्या संसदेला 'हाऊस ऑफ कॉमन्स' म्हणतात व त्या सभेला 'खालची यंत्रणा' असे मानलेजाते. ह्या खालच्या यंत्रणेच्या कारभारावर वेगळा विचार करून वेळोवेळी मंजुरी देण्यासाठी 'राजा'च्या प्रतिनिधींची 'वरची यंत्रणा' (अपर हाऊस) असते व त्या यंत्रणेला 'हाऊस ऑफ लॉर्ड्स' ह्या नावाने संबोधतात.

ब्रिटनमध्ये मुळात 'राजा'ची सत्ता (मोनार्की) होती व त्या राज्यपद्धतीतूनच लोकशाही राज्यपद्धती प्रदीर्घ कालावधीनंतर, परंतु टप्प्याटप्प्याने, अनुभवातून, हळूहळू विकसित होत गेली. म्हणूनच ब्रिटिश लोकशाहीला लिखित संविधान नाही; आणि नवलाची गोष्ट म्हणजे सर्व कारभार विकसित होत गेलेल्या परंपरेनुसार (कन्व्हेन्शन) चालतो. स्थित्यंतरादरम्यान गरज म्हणून ब्रिटनमध्ये 'खालची' व 'वरची' अशा दोन यंत्रणा निर्माण झाल्या. परंपरेतून निर्माण झालेल्या त्या दोन्ही यंत्रणा आजही ब्रिटनमध्ये अस्तित्वात आहेत; ते मात्र महत्त्वाच्या एका वेगळ्या उद्दिष्टाकरिता. तो दुसरा उद्देश, अर्थातच, जनतेने निवडून दिलेल्या संसदेच्या कारभारावर नजर ठेवणे असा आहे. निवडणुकीतून प्रस्थापित झालेल्या संसदेने घेतलेल्या निर्णयांवर स्वतंत्रपणे विचार करून ढोबळ मंजुरी देण्याचे (चेक्स ॲन्ड बॅलन्स साधणे) हे जे दुसरे उद्दिष्ट आहे ते इतर प्रकारच्या लोकशाही राज्यपद्धतींतसुद्धा विविध प्रकारांनी साधले जाते. (ब्रिटिश पद्धत निवडल्यामुळे आपल्याकडेही विधान 'सभा' व 'परिषद' आणि 'लोक' व 'राज्य'सभा अशा दुहेरी यंत्रणा अस्तित्वात आल्या आहेत.)

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी अनेक दशके भारतीय लोकशाहीच्या स्वरूपावर दिग्गजांमध्ये वाद चालायचे. त्या वादांच्या संदर्भात 'हिंद स्वराज्य' ह्या त्यांच्या सुरुवातीसुरुवातीच्या पुस्तिकेत गांधी म्हणतात, ''जिला तुम्ही लोकशाहीची जननी व जगातील आदर्श राज्यव्यवस्था म्हणत आहात त्या इंग्लंडच्या पार्लमेंटला मी नुकताच जवळून पाहून येत आहे. ती वेश्या व वांझ आहे. ती वेश्या आहे, कारण ती नेहमीच धनदांडग्यांच्या हातात राहते व ती स्वत:हून कोणताही मूलभूत प्रश्न सोडवण्याचे सृजनात्मक काम करू शकत नाही म्हणून ती वांझ आहे.'' गांधींचा रोख त्या राज्यपद्धतीवर, म्हणजेच भविष्यातील तिच्या भारतामधील अंमलबजावणीबाबत होता. अनेक संदर्भात ती भविष्यवाणी खरी ठरत असल्याचे आज आपल्याला जाणवते देखील!

जी पद्धत जगातील आदर्श राज्यव्यवस्था मानली जाते त्याच पद्धतीवर आधारलेल्या आपल्या संविधानाची अंमलबजावणी होताना गांधींची भविष्यवाणी खरी का ठरते? अप्रत्यक्षपणे ह्याच प्रश्नाचे उत्तर व त्यानुसारची उपाययोजना गेली आठ-दहा वर्षे मी शोधतो आहे आणि त्या अभ्यासातूनच 'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास आला.

अभ्यासोत्तर प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर आपल्याला 'आगरकर-टिळक वादात' सापडते. इतिहासात सरंजामशाहीत जोपासल्या गेलेल्या भारतीय समाजाला, ब्रिटिश समाजात शेकडो वर्षांनंतर विकसित झालेली लोकशाही राज्यव्यवस्था आम्ही एका रात्रीत बहाल केली. कदाचित, त्या व्यवस्थेची भारतात अंमलबजावणी होताना म्हणूनच लोककल्याणाचे उद्दिष्ट दुर्लक्षित राहात असावे. कारण, ब्रिटनमध्ये लोकशाही राज्यपद्धत विकसित होत असतानाच्या शे-दीडशे वर्षांच्या काळात तेथील समाजही लोकशाही राबवून घेण्यासाठी अप्रत्यक्षपणे विकसित होत होता; त्या गोष्टीचा मात्र आम्हाला विसर पडला.

माझ्या मते, गोखले तत्त्ववेत्ते होते, आगरकर समाजधार्जिणे आणि टिळक राजकारणी होते. गांधींनी गोखल्यांना गुरू मानले. पण, टिळकांच्या निधनानंतर १९२० पासून स्वातंत्र्यलढ्याची धुरा सांभाळताना देशाच्या स्वातंत्र्यालाच, हळुहळू, गांधींकडून अग्रक्रम दिला गेला. स्वातंत्र्यलढ्यावर लक्ष केंद्रित करावे, मन द्विधा होऊ देऊ नये, हे जरी प्रमुख कारण असले तरी त्यांच्याकडून खऱ्या समाजविकासाला दुय्यम स्थान दिले गेले, आणि गांधींच्या पश्चात तर तो विषय दुर्लक्षितच राहिला.

राजकीयदृष्ट्या जरी भारतात लोकशाही रुजली असली तरी समाजकल्याणाच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन

करताना भारतीय लोकशाही राज्यव्यवस्था तोकडी पडते, हे मान्य करावेच लागेल. प्रस्तुत समस्येचे कारण शोधताना चंद्रपूरच्या मोहनभाईंनी केलेले एक निरीक्षण मला खूप महत्त्वाचे वाटले. मोहन हिरालाल म्हणाले होते, की भारतीय लोकशाहीचा पाया म्हणजे 'वाळू'च. प्रत्यक्ष जनतेकडून साधलेल्या निवडणुकांच्या प्रक्रियेमुळे प्रत्येक मतदार हा वाळूच्या कणासारखा कमजोर भासतो, ठरतो. विकेंद्रीकरणातून ग्रामसभेला महत्त्व प्राप्त व्हावे व ग्रामसभेने सर्वसहमतीने एखाद्या व्यक्तीचे नाव आमदार/खासदार म्हणून मुक्रर करावे, असा मोहनभाईंचा प्रस्ताव होता. वाळूच्या कणांतून ग्रामसभेच्या रूपाने तयार झालेल्या चिऱ्यांच्या पायावर रचलेली लोकशाही संसद जास्त परिणामकारक ठरेल, असे त्यांचे प्रतिपादन होते. आदर्श असला तरी त्या प्रस्तावावर विचार करताना आज त्या बदलाला खूप उशीर झाला आहे, असे वाटते. मोहनभाईंना गरजेचा वाटलेला प्रस्तुत बदल हळुहळू साधणे शक्य नाही आणि अस्तित्वात असलेली आजची निवडणूक प्रक्रिया राजकारणी मोडीतही काढू देणार नाहीत, ही खरी महत्त्वाची कारणे आहेत. शिवाय, सुचवलेल्या बदलाद्वारे नवीन समस्या निर्माण होतात का, हे अनुभवातूनच उलगडणार. ती अनिश्चितता स्वीकारण्या-पेक्षा हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे की आजची लोकशाही राज्यव्यवस्था लोककल्याणाच्या दृष्टिकोनातून परिणामकारक नसली तरी ती व्यवस्था राजकीय दृष्टिकोनातून भारतात व्यवस्थित प्रस्थापित झाली आहे. म्हणून त्या रचनेला धक्का लावू नये असे मला वाटले. जे सुधार साधायचे आहेत ते आजच्या व्यवस्थेच्या व संविधानाच्या चौकटीत राहूनच साधले जावेत ह्या दृष्टिकोनातून मग मी विचार करू लागलो.

भारताने अंगिकारलेले संविधान आणि राज्यव्यवस्था ब्रिटिशांसारखीच वाळूच्या पायावरच रचली आहे, परंतु समाजकल्याणाच्या दृष्टिकोनातून ब्रिटिश व्यवस्था मात्र भारतासारखी कोलमडली आहे असे जाणवत नाही. तिथे ती यशस्वी ठरते कारण तेथील भक्कम मध्यमवर्गाची सुसंस्कृतता; सुसंस्कृत मध्यमवर्गाचे 'सिमेंट' गरजेची खंबीरता त्या वाळूच्या पायाला मिळवून देते, असे मला वाटते.

मध्यमवर्ग सुखवस्तू असतो, संस्कारित असतो व समग्र समजातील इतरांना तो दिशादर्शक ठरतो. भारतीय समाजातील पूर्वीचे सुखवस्तू सरंजामशाहीत मुरलेले आहेत व नव्याने निर्माण होणारे तरुण सुखवस्तू एक तर खऱ्या लोकशाही समाजात जोपासले गेलेले नाहीत व त्यांना असलेले परदेशाचे आकर्षणसुद्धा या संदर्भात खूप महत्त्वाचे ठरते. तरीही, देशाने साधलेल्या भौतिक प्रगतीमुळे देशातील सुखवस्तू मध्यमवर्गाची टक्केवारी वाढते आहे, ही एक जमेची बाजू. मात्र, निर्माण होणारा हा सुखवस्तू मध्यमवर्ग खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आहे का, आणि त्या संदर्भात सुसंस्कृतता म्हणजे काय, हे प्रश्न पण निर्माण होतात.

ब्रिटिश मध्यमवर्गाच्या सिमेंट ठरणाऱ्या मानसिकतेवर विचार केला तर पुढील महत्त्वाच्या गोष्टींचा संदर्भातील लक्ष्य केलेल्या सुसंस्कृततेत समावेश करावा लागेल.

- संविधानाबद्दल योग्य ती माहिती,
- लोकशाही मनोवृत्ती,
- मानवी हक्क व समतेची जाण,
- शहरी/नागरी व्यवस्थांचे व सेवाक्षेत्राच्या महत्त्वाचे समर्पक आकलन आणि त्या वापरण्यात घ्यायची दक्षता व पाळावयाची पथ्ये,
- सक्षम समाजनिर्मितीमुळे सर्व घटकांना लाभणारे हक्क, फायदे व निर्माण होणाऱ्या जबाबदारीतून सामाजिक बांधिलकीचे भान, वगैरे.

थोडक्यात, लोकशाही राजवटीला लायक, आधुनिक नागरी जीवनशैली व गरजेची व्यवस्था ह्यांचे भान असलेला, वैयक्तिक व सार्वत्रिक जीवनातील पथ्ये व जबाबदारी ह्यांची वर्तणुकीतून सांगड घालू शकणारा, दीपस्तंभासारखा खंबीर व सुखवस्तू मध्यमवर्ग निर्माण करणे, ही काळाची गरज आहे. अशा वर्गाची टक्केवारी समाजात वाढली की इतरही आपोआप मार्गावर येतील. अशी समाजनिर्मिती म्हणजे समाज संस्कारित करणे. पारंपरिकरीत्या संस्कार देण्याचे कार्य कुटुंब व धर्मव्यवस्था सांभाळत होत्या. परंतु, आजच्या भारतीय समाजात उपरोक्त 'सुसंस्कृती'चे संस्कार देण्यात त्या असमर्थ आहेत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

इतर काही देशांत अनुभवतो तसे देशाचे शासन 'कायदा व शिक्षा' ह्या माध्यमातून असा समाज निर्माण करू शकते आणि हुकूमशाही देशांत ते साधणे सहज शक्य असते. परंतु, आपल्या लोकशाहीत ती बाब 'आणिबाणी'तील अनुशासनातून साधली गेली तशी तात्पुरती ठरेल. कायद्याच्या बडग्यातून साधली गेलेली वृत्ती क्षणभंगूर ठरू शकते. दुसरी आणि जास्त महत्त्वाची बाब म्हणजे शासनाकडून, राजकारण्यांकडून सक्षम समाजनिर्मितीची अपेक्षा करणे म्हणजे त्यांनी स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे ठरते. मला ह्या गोष्टीचे आकलन होण्याला दोन महत्त्वाची कारणे आहेत. पहिले म्हणजे समाजाच्या आजच्या मानसिकतेतून राजकारण्यांना मतपेढ्या निर्माण करणे सोयीचे जाते व दुसरे कारण म्हणजे, समाजाच्या मानसिकतेत रुजलेली सरंजामशाहीची वृत्ती; ती वृत्ती राजकारण्यांचा, नेत्यांचा सतत 'उदो उदो' करत असते व त्यामुळे त्यांच्या कामचुकारपणाकडे एक तर जनता दुर्लक्ष करते व मुख्य म्हणजे त्यांना विरोध करण्यास घाबरते. ह्या व इतर कारणांमुळे सक्षम समाजनिर्मितीसाठी व गरजेच्या विकेंद्रीकरणासाठी अनेक कायदे झाले, नेत्यांकडून कायम 'वाचाळता' साधली गेली तरी समाजाचा मूळ सरंजामशाहीच्या वृत्तीचा ढाचा मात्र गेल्या साठ वर्षांत बदलला गेला नाही.

लोकशाहीचा डोलारा भक्कम पायावर,

सक्षम समाजावर अवलंबून असतो. आपला वाळूचा 'सरकता' पाया सुसंस्कृततेच्या सिमेंटने मजबूत करणे हाच त्यासाठी महत्त्वाचा व इतर पर्यायांच्या मानाने अंमलात आणण्यासाठी कमी संघर्षाचा व शक्य असा उपाय आहे. भारतात रुजलेल्या राजकीय लोकशाहीकडून लोककल्याण साधण्याकरिता प्रस्तुत लक्ष्य माझ्या समग्र दृष्टिकोनातून दिशादर्शक ठरले व त्याच मार्गाने पुढे जाण्यासाठी मग मी विचार करू लागलो.

संस्कार हे बालवयातच साधायचे असतात आणि त्यासाठी बालवयात कुटुंब, धर्म व शाळा ह्या तीन व्यवस्थांचा विचार अटळ ठरतो. तो करताना उद्याची पिढी संस्कारित करण्यासाठी भारतातील शालेय शिक्षणाचे महत्त्व मग माझ्या लक्षात आले. म्हणूनच, 'औपचारिक व शास्त्रोक्त समाजशिक्षण' हा विषय भारतातील समग्र शाळांमध्ये अनिवार्य करून त्या विषयात प्राप्त झालेल्या गुणांचा व्यावसायिक क्षेत्रातील प्रवेशासाठीही विचार झाला पाहिजे, ह्या निष्कर्षावर मी येऊन ठेपलो आणि पुढील प्रश्नांची समर्पक उत्तरे 'जनसंवाद'च्या माध्यमातून आम्ही शोधू लागलो.

- शालेय समाजशिक्षणातून उद्याची संस्कारित पिढी घडवता येईल का?
- प्रस्तुत शिक्षणासाठी अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती (पेडगॉगी) ठरवता येईल का?
- संबधित समाजशिक्षण देण्यासाठी आजच्या शालेय शिक्षकांचे गरजेचे प्रशिक्षण कसे साधता येईल?

उपरोक्त प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गेले दोन महिने 'जनसंवाद' हा वैचारिक गट महाराष्ट्रात गावोगावी पन्नासेक ठिकाणी शैक्षणिक चर्चा घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहे. ह्या प्रश्नांच्या समर्पक उत्तरांतून 'जनसंवाद'च्या पुढील कार्यक्रमांची दिशा ठरावी. 'जनसंवाद'ने पुण्यात अशातच पंधराएक शैक्षणिक विशेषज्ञांची एक गटचर्चा आयोजित केली होती. लाभलेल्या त्या प्राथमिक स्वरूपाच्या प्रतिसादानुसार 'जनसंवाद' योग्य रस्त्यावरून मार्गक्रमण करत आहे हे ध्यानात येते.

केरळमधील डॉ. वेंकटरमणी ह्यांच्याबरोबर इंटरनेटवरून मी 'जनसंवाद'चा विचार, उद्दिष्ट व कार्यक्रम ह्यांबद्दल सध्या चर्चा करतो आहे. उपरोक्त बाबींचे प्राथमिक आकलन झाल्यावर ते म्हणाले होते, ''तुमचे प्रयत्न 'अंडरगर्डिंग' स्वरूपाचे आहेत.''

'अंडरगर्डिंग' हा शब्द परिचित असला तरी माझ्या नेहमीच्या वापरातील नव्हता, म्हणून समर्पक अर्थाच्या शोधासाठी मी शब्दकोष उघडला. 'अंडरगर्ड' ह्या क्रियापदाचा मूळ अर्थ आहे –'तळाकडून मजबूती देणे, खालच्या बाजूने आवळणे'

देशातील लोकशाहीच्या वाळूच्या अस्थिर पायाला बळकटी आणण्यासाठी सुसंस्कृततेचे सिमेंट शालेय शिक्षणातून पुरवून देशात राज्यव्यवस्थेकरिता यथोचित रुजलेल्या लोकशाहीला लोककल्याणासाठी आवळून बंदिस्त करण्याच्या 'जनसंवाद'च्या प्रयत्नांना 'अंडरगर्डिंग' हे अत्यंत समर्पक विशेषण आहे, असेच मानावे लागेल!


**सु. गो. तपस्वी**


समन्वयक–जनसंवाद

भ्रमणध्वनी – ९७६६१ ५२२५३

suhas@fandsindia.com



**वाचकदिनी प्रसिद्ध**




## गारुड गझलचे

सदानंद डबीर

उर्दू गझल ऐकताना, मराठी माणसाच्या तोंडूनही 'वाऽ क्या बात है' अशी नकळत दाद येते. ती नेमकी कुठल्या गोष्टीला येते? मराठी गझलला तशी दाद का येत नाही? हे 'काहीतरी'– ज्याला 'गझलियत' म्हणतात, जी शब्दात सांगता येत नाही, ती मराठी गझलमधून निसटून जाते आहे का?

समकालीन उर्दू कवींच्या गझला वाचल्यावर जाणवते की, उर्दू गझल 'बहुरूपिणी' आहे. आधुनिक उर्दू गझल अगदी तरल कवितेच्या शैलीनेही लिहिली जाते. बव्हंशी मराठी गझल मात्र एकसूरी वाटते का? मराठी गझलच्या संदर्भात, समकालीन उर्दू गझलांचा तुलनात्मक सौंदर्यवेध घेतला आहे सिद्धहस्त मराठी गझलकार सदानंद डबीर ह्यांनी.

**– उषा मेहता**

**मूल्य १२० रुपये । सवलतीत ७५ रुपये**

# ‘ठाणे तिथे काय उणे’

## ग्रंथाली वाचकदिन (ठाणे केंद्र)

## प्रभाकर भिडे

दरवर्षी ग्रंथालीचे ठाणे केंद्र आपला वाचकदिन वेगळ्या पद्धतीने व वैशिष्ट्यपूर्णरीत्या साजरा करते. हा वाचकदिन विद्यार्थीवर्ग डोळ्यांसमोर ठेवून करतात. गेली बारा वर्षे हा उपक्रम अविनाश बर्वे व श्रीधर गांगल मोठ्या उत्साहाने व उमेदीने साजरा करतात.

दरवर्षी विद्यार्थ्यांना वेगळी संकल्पना, वेगळा विषय दिलेला असतो. यामध्ये सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनी करायच्या असतात. शिक्षक फक्त त्यांना आवश्यक तेवढी मदत व मार्गदर्शन करतात. मागे एक वर्षी ‘ठाण्यातील बालकवी’ हा विषय होता. त्यात ठाण्यातील ३०/४० शाळांमधील ५०० मुलांनी आपल्या कविता सादर केल्या. त्यातील निवडक चांगल्या कवितांचे ग्रंथालीतर्फे पुस्तक प्रकाशित करून मुलांना मोफत दिले गेले. विशेष म्हणजे त्यामधील कवितांना अनुरूप चित्रे मुलांनीच काढली होती. अशाप्रकारे मुलांच्या बुद्धिमत्तेला व विकासाला चालना दिली गेली होती. त्यानंतर एक वर्ष डॉक्टर नरेंद्र जाधवांच्या ‘आमचा बाप आन् आम्ही’ या पुस्तकांतील प्रसंगाचे नाट्यसादरीकरण मुलांनी केले. त्यामध्ये २५ शाळांनी भाग घेतला. त्यातील निवडक पाच प्रसंगांचे सादरीकरण डॉ. नरेंद्र जाधवांच्या समोर करून दाखवले. त्यावेळी ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू स्वत: येऊन आपल्या पुस्तकातील प्रसंगाचे सादरीकरण बघतात. मुलांना मार्गदर्शन करतात. ते कसे घडले ते समजवून सांगतात व मुलांच्या विविध प्रश्नांना सुंदर उत्तरे देतात. मला वाटते, ‘लेखक तुमच्या भेटीला’ हा कार्यक्रम असा भावी नागरिकांपुढे (सध्याच्या विद्यार्थीवर्गापुढे) करणे यापेक्षा चांगली गोष्ट कोणती? असे नाविन्यपूर्ण विषयावरील १२ वर्षे कार्यक्रम केल्यावर यंदा कोणता विषय देणार याबद्दल विद्यार्थीवर्गात उत्सुकता होती. त्यामध्ये गेली तीन-चार महिने चर्चेत असलेले मराठी साहित्य संमेलन ठाणे येथे २५ ते २७ डिसेंबर २०१०ला भरणार होते. साहित्य संमेलन हा एक प्रकारे वाङ्मयाच्या सर्व शाखांचा उत्सव असतो. तेव्हा या संमेलनाच्या निमित्ताने ‘ठाणे तेथे, काय उणे’ असा विषय देऊन ठाण्यामधील विविध संस्थांचे सादरीकरण व ठाण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीची ओळख असा हा विषय ठरला. जणू ही साहित्य संमेलनाची पूर्वतयारीच म्हणाना! वाङ्मयीन वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न; तोही नाट्य, गायन, कीर्तन अशा साहित्याच्या कोणत्याही स्वरूपात सादर करावा अशी संकल्पना ३५ शाळांना दिली. त्यामध्ये १८/१९ डिसेंबर या दोन दिवसांत २०/२५ शाळांनी प्रत्येकी दहा मिनिटांत साधारण दहा विद्यार्थ्यांच्या गटांनी ठाण्याच्या मो.ह.विद्यालयात विविध प्रकारे सादरीकरण केले. ती या वर्षी यजमान शाळा होती. बारा वर्षापूर्वी पहिला विद्यार्थीवर्गाचा ‘वाचकदिन’ याच मो.ह. विद्यालयात झाला होता. खरे म्हणजे ही स्पर्धा नसते. पण विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळतो. विकसाला चालना मिळते. मुले इतर शाळांमधील उपक्रम आवडीने बघतात.

या दोन दिवसांत ठाण्यांतील विविध वैशिष्ट्यपूर्ण संस्थांचा इतिहास कीर्तन/भजन/नाट्यरूपांतर अशा मनोरंजक माध्यमांतून रसरशीतपणे सादर केला गेला. ते कार्यक्रम बघताना जाणवले की मुलांच्या अंगात अनेक गुण आहेत. दूरदर्शन व इतर माध्यमांमुळे त्यांना सर्व नवीन गोष्टींची माहिती आहे. त्यांना थोडी मदत केली तर ती चांगले कलाकार होऊ शकतील.

पूर्वीपासून ठाण्याला वेड्यांचे रुग्णालय आहे. यासंबंधीचा कार्यक्रम सादर केला. काही वेळा माणसे घरच्या परिस्थितीने किंवा प्रसंगाने तात्पुरती वेडी होतात. त्यावर काही उपाय झाले की ती बरे होतात. बाल विद्या मंदिरच्या (कनिष्ठ महाविद्यालय) विद्यार्थ्यांनी एक नाटुकले सादर केले, त्यामध्ये एक मुलगा वडिलांची सही करून बँकेतून सर्व पैसे काढतो व मित्रांबरोबर दारू व इतर व्यसनांत उडवतो. गरीब मध्यमवर्गीय वडिलांच्या मनावर याचा परिणाम होतो व त्यांना वेडाचे झटके येतात. पुढे बहिणीने, आईने व शेजारील मित्रांनी समजावून सांगितल्यावर त्याला आपली चूक कळते. तो सुधारतो. काही दिवसांनी वडीलही बरे होतात. मुलांनी हे फार सुंदररीत्या सादर केले.

खाडी असल्यामुळे ठाणे मासेमारी करणाऱ्या कोळी व मिठाचा धंदा करणाऱ्या आगरी समाजाचे पूर्वापार गाव. कोळी समाजातील एक व्यक्ती पांडुबुवा हे अक्कलकोट महाराजांचे शिष्य झाले.त्यांचे नामकरण ‘आनंदभारती’ असे केले. त्यांनी आनंदभारती संस्था काढून आपल्या

समाजातील लोकांना शिक्षण/सहकार्य कसे महत्त्वाचे आहे हे भक्तिमार्गांतून /कीर्तनातून दाखविले. त्यामुळे या अशिक्षित समाजातील मुले शिकू लागली. तसेच त्यांनी सहकारी पतपेढी काढून सावकाराच्या पाशांतून समाजाला वाचविले. त्यांचे हे चांगल्या पद्धतीचे कार्य नाखवा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आनंदभारती व त्यांच्या शिष्यांचा अभिनय करून दाखविले व आनंदभारती संस्थेची ओळख करून दिली.

राजश्री शाहू महाराज शाळा- या शाळेने ठाण्यातील प्रसिद्ध मावळी मंडळ या संस्थेचे कार्य विविध शारीरिक कवायती करून उभे केले. यामध्ये दांडपट्टा, तलवार चालविणे यांची प्रात्यक्षिके दाखविली. मनीष माने या विद्यार्थ्याने डोक्यावर तलवारीने नारळ फोडला. पुढे पेटत्या मशाली फिरवून दाखविल्या. त्याचे गुरू त्याचे वडील आहेत. तसेच इतर मुलांनी चित्तथरारक प्रात्यक्षिके दाखवून मावळी मंडळाचे कार्य विषद केले. एखाद्या शाळेतील मुलांनी कवायतीसारख्या माध्यमातून जे दाखविले ते कौतुकास्पद आहे. आज मावळीमंडळांचे सभागृह, व्यायामशाळा वगैरे विविध उपक्रम चालू असतात.

ठाण्यांतील महापालिकेच्या शाळा क्र.५ यांनी झोपडी विकास योजना राबवून गरीब झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना शासन पक्की घरे बांधून देणार असल्याची योजना नाटयरूपाने सादर करून सांगितली. प्रत्येकाला ४०० स्वे.फिट घरे मिळणार म्हणून गरीब लोक किती आनंदात आहेत ते दाखविले.

भाग घेणाऱ्या प्रत्येक मुलाला ग्रंथालीतर्फे पुस्तक भेट दिले जात होते. दहा मुलांचा गट सादरीकरण करत असल्यामुळे दहा पुस्तकांचा संच भेट दिला जाई. मुलांनी ती आपापसात बदलून वाचावी अशी अपेक्षा श्री. अविनाश बर्वेसरांनी मुलांनी सांगितली. मुलांसह शिक्षकांनाही मोठे पुस्तक भेट दिले जाई.

ज्ञान प्रसारिणी शाळा, कळवा यांनी आपल्या सादरीकरणांतून पर्यावरणाचे महत्त्व सांगितले. ही शाळा दहा वर्षे असे उपक्रम करते. पर्यावरण जागृतीकरिता मासिक चालविते. त्याकरिता पर्यावरण दक्षता मंच स्थापन झाला आहे. त्याकरिता 'हरियाली' सारख्या संस्था फळांच्या बिया गोळा करून त्याची लागवड फार मोठ्या प्रमाणात करतात. त्या शाळेच्या शिक्षिका रमा नेने यांचा आवाज सुंदर असून त्यांनी पर्यावरणाची गाणी व नाट्य यांचे सादरीकरण मुलांकडून करवून घेतले. अशा उत्साही शिक्षिका असतील तर पर्यावरणाची जाणीव व जागृती निश्चितपणे मुलांपर्यंत पोहोचेल असे आशावादी चित्र दिसते.

बेडेकर विद्यामंदिर शाळेने, ठाणे कारागृह हा पोर्तुगीजांनी बांधलेला किल्ला असून तेथील कैद्यांकरिता काय काय उपक्रम चालतात ते सादर केले. त्यामध्ये सुतारकाम, सतरंज्या बनवणे, शिवणकाम, लोहारकाम, बेकरीउत्पादन अशी अनेक उत्पादने संवादरूपाने काव्यरूपाने सादर केली.

याशिवाय श्रीराम विद्यामंदिर, सावरकर रोड या शाळेने (श्रीमती सावित्रीदेवी थडानी शाळा) यांच्या मुलांनी कीर्तनाच्या माध्यमांतून रेमंड वुलन मिल कशी पाडली गेली, यामध्ये झालेले मालकांचे स्वार्थी राजकारण, कामगारांचे हाल हे सारे भजन-गाणे अशा स्वरूपात उत्तमरीत्या सादर केले.

या श्रीराम विद्यामंदिर शाळेने पुढच्या वर्षी ठाणे वाचकदिनाचे आयोजन करण्याचे निमंत्रण दिले असून हा वाचकदिन आता मुलांचा झाला आहे. मुले ज्या उत्साहाने तो सादर करतात ते बघितले की ती मुलांची गरज झाली आहे. मुलांच्या हौशी कलागुणांना वाव तर मिळतोच पण बुद्धिमत्ता विकासाला चालना मिळते. असे उपक्रम ठाणे ग्रंथालीने राबविल्यावर त्यांचे जितके कौतुक करावे तितके थोडेच.

असे अनेक कार्यक्रम दोन दिवसांत सादर केले गेले. त्यातील निवडक तीन कार्यक्रम ग्रंथालीच्या वाचकदिनी २४ डिसेंबर २०१० रोजी सादर केले. सर्व मोठ्या लोकांना त्या कलाकृती आवडल्या. अशा रीतीने ग्रंथालीचा छोट्यांचा 'वाचकदिन' मोठ्यांसाठी आनंददायी ठरला.



**प्रभाकर भिडे**

बी/२०९, यमुना माधव सोसायटी,

सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व)

फोन : ०२५१-२४४३६४२






## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१०

सुधीर थत्ते/ नंदिनी थत्ते

नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या वैज्ञानिक शोधांची कहाणी आणि त्याबद्दलची यथार्थ माहिती कथारूपात देणारे पुस्तक, सर्वोत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी राज्य शासनाचा तीन वर्षे पुरस्कार, लोकांपर्यंत विज्ञान नेण्याचा अभिनव उपक्रम! खुद्द नोबेल विजेत्यांचा अभिप्राय

**मूल्य ८० रुपये**

**सवलतीत ५० रुपये**